३) •सुषमादुषमा• :- उत्सेधादिकांच्या क्षीणतेमुळे सुषमादुषमा काळाची निर्मिती होते. हा काळ दोन कोटाकोटी सागरोपम समान असतो. या काळातील शरीराची उंची दोन हजार धनुष्य समान व आयुष्य एक पल्य असते. एक दिवसाच्या अंतराने आवळ्याच्या एवढा अमृतमय आहार ते ग्रहण करीत. या काळातील बालके शय्येवर झोपण्यात सात दिवस व्यतीत करीत. त्यानंतर उपवेशनादी क्रियामध्ये क्रमशः सात सात दिवस व्यतीत होत असत. या काळातील आठवा भाग शिल्लक असताना प्रथम कुलंकराची निर्मिती होते. नंतर क्रमशः चौदा कुलंकर उत्पन्न होतात. या काळातील युगलांचे शामवर्णी शरीर होते. इतर सर्व स्थिती सुषमा काळाप्रमाणेच असते.

४) दुषमासुष्मा :- ऋषभनाथ तीर्थकराच्या निर्वाणानंतर तीन वर्ष व साडेआठ महिन्यांनी दुषमासुषमा नावाचा चर्तुथ काळ प्रविष्ठ झाला. या काळात शरीराची उंची पाचशे पंचवीस धनुष्य प्रमाण होती. हा काळ एक कोटाकोटी सागरोपम समान होता. या काळात प्रति दिन आहार करणाऱ्या, पंच वर्ण महाबल पराक्रमी, अनेक प्रकारचे भोग भोगणाऱ्या धर्मानुरक्त होऊन प्रवर्तन करणाऱ्या त्रेसष्ट शलाका पुरुषांची क्रमशः निर्मिती झाली.

५) दुषमा :- दुषमा काळ २१ हजार वर्षांचा असतो. या काळातील स्त्री-पुरुष सुरुवातीला १२० वर्षाच्या आयुर्मर्यादेचे, सात हात उंचीचे , बहु आहारी, रुक्षवर्ण, कमी ताकत, शौचाचारांनी हीन, भोगात असक्त राहणारे असतात. वीर भगवानाच्या निर्वाणानंतर तीन वर्ष आठ महिने व एक पंधरवडा ( पक्ष ) व्यतीत झाल्यानंतर दुषमा काळ प्रविष्ठ झाला. या काळापर्यतच चातुर्वर्ण्य संघ राहतो. यानंतर राहात नाही. या काळात मुकुटधारी चंद्रगुप्तानी अंतिम दीक्षा धारण केली. यानंतर मुकुटधारी प्रव्रज्या धारण करीत नाहीत. या काळातील राजवंश क्रमशः न्यायवृत्तीपासून विचलित होत जाऊन अन्यायी बनतात. आचारगंधरांच्या २७५ वर्षानंतर एक कल्की राजा होतो. तो मुनींच्या आहारावरही कर मागतो. तेव्हा मुनि अंतराय जाणून निराहार परत जातात. त्यावेळी त्यांच्यापैकी कोणा एकास अवधिज्ञान प्राप्त होते. त्यानंतर कोणी तरी असुरदेव मुनींच्या उपसर्गाची माहिती मिळाल्याने धर्मद्रोही कल्कीला मारून टाकतो. त्यानंतरच्या प्रत्येकी ५०० वर्षात एक उपकल्की व १००० वर्षात एक कल्की निर्माण होतो. प्रत्येक कल्कीच्या वेळी मुनींना अवधिज्ञान प्राप्त होते. चातुर्वर्ण व्यवस्था कमी कमी होत जाते. या काळात चांडाळादी अनेक मनुष्य दिसतात व २१ वा कल्की होतो . या काळातच वीरांगज नावाचे मुनि सर्वश्री नावाची आर्यिका त्याचप्रमाणे अग्निस्त व पंगुश्री नावाचे श्रावक-श्राविका युगल निमार्ण हाते. राजाकडुन शुल्क मागण्यात आल्यानंतर मुनि श्रावक, श्राविकांना दुःषमा काळाचा अंत झाल्याचा संदेश देतात. त्यावेळी मुनींचे आयुष्य फक्त तीन दिवस राहिलेले असते. तेव्हा ते चारीही संन्यास मरणपूर्वक कार्तिक कृष्ण अमावस्येला हा देह सोडून सौधर्म स्वर्गातील देव बनतात. त्याच दिवशी क्रोधाने असुर देव कल्कीला मारुन टाकतो व सूर्यास्ताच्या वेळी अग्नि नष्ट होतो. याप्रमाणे कल्की नष्ट होऊन नरकात जातात. या पाचव्या काळाच्या शेवटच्या प्रतिपदेच्या दिवशी पूर्व भागात धर्माचा नाश होतो. मध्यान्हकाळी राजाचा नाश होतो व अंतकाळी अग्नीचा नाश काळाच्या स्वभावानुसार होतो.

६) दुषमादुषमा ( अति दुषमा ) :- २१ कल्कीनंतर तीन वर्ष आठ महिने व एक पक्ष गेल्यानंतर अतिदुषमा नावाच्या सहाव्या काळाची सुरुवात होते. या काळात शरीराची उंची तीन साडेतीन हात व उत्कृष्ट आयुष्य २० वर्षाचे असते. आयुष्याचे प्रमाणही दिवसेंदिवस कमी होत जाते. या काळात मनुष्य धूम वर्णाचा असतो. या काळाच्या शेवटी १५ वर्ष आयुष्याचा व १ हात उंचीचा मानव बनतो. या काळातील मानवाचा आहार मुळे, फळे व मासे इत्यादी असतो. या काळातील मानव नग्न अवस्थेत वनातून भटकतो. मानव पशुप्रमाणे आचरण करणारा, पति-पत्नीचे नाते न जाणणारा, क्रूर, बहिरा, आंधळा, दारिद्री व क्रोध इत्यादींनी परिपूर्ण, दीन, नाना प्रकारच्या व्याधींनी युक्त असलेल्या दुर्गधयुक्त शरीर असलेला असतो. या काळात नरक व तिर्यचगतींतून आलेले जीवच येथे जन्म घेतात व मरण पावून परत नरक किंवा तिर्यचगतीतच जातात. दिवस प्रति दिवस जीवाची उंची, आयुष्य व वीर्य कमी कमी होत जाते . या काळाच्या अंताला ४९ दिवस कमी असतांना भयकारक प्रलय होतो. यावेळी सात दिवस भयंकर वारा वाहतो. सात दिवस बर्फ पडतो, सात दिवस पाऊस पडतो, नंतर सात दिवस विष वर्षा होते, नंतर सात दिवस अग्नि वर्षाव होतो. ज्यामुळे पर्वत, नद्या सर्व नष्ट होऊन पृथ्वी समतत्व बनते. सात दिवस आकाश धुरांनी व्यापलेले राहते. त्यानंतर शुक्लपक्षानंतर जसा कृष्ण पक्ष येतो त्याच पध्दतीने अवसर्पणी काळानंतर उत्सर्पिणी काळाचा प्रारंभ होतो.

(७) उत्सर्पिणी काळ :- ज्या काळात बल, आयुष्य व उत्साह इत्यादींचे उत्सर्पण किंवा वृध्दि होते. त्यालाच उत्सर्पिणी काळ म्हणतात. उत्सर्पिणी काळाचे प्रमाणही दहा कोटाकोटी सागर आहे. उत्सर्पिणी काळाचेही दुषमादुषमा, दुषमा, दुषमासुषमा, सुषमा व सुषमासुषमा असे सहा प्रकार पडतात.

दुषमादुषमा या काळातील मानवाचे आयुष्य १५ वर्ष व उंची एक हात असून ती दिवसेंदिवस वाढत जाते. या काळाच्या सुरुवातीला आकाश संपूर्णतः धूम्राच्छादित असते. सुरुवातीला सात दिवस सारखी पुष्प वृष्टी होते. त्यानंतर सात दिवस क्षीरवृष्टि, सात दिवस घृतवृष्टि, सात दिवस इक्षुरसवृष्टि होते. पूर्वी विजयार्ध पर्वताच्या विशाल गुंफेत विद्याधर व देवीनी सुरक्षित ठेवलेल्या जीवांपैकी जे जिवंत असतात ते बाहेर पडतात व मधुर मिष्ठान्न समान असलेले मृत्तिकेचा आहार करतात. व्रतालंकार रहित होऊन धूमवर्ण मनुष्य जीवन प्राप्त करुन वाढत वाढत ते दोन हात उंचीचे बनतात. या काळातील मनुष्य व तिर्यच नग्न राहून पशुप्रमाणे आचरण करतात. यानंतर यांची तेज , बल, बुध्दि हलकेहलके वाढत जाते. अशा प्रकारे २१००० वर्षानंतर हा अतिदुषमाकाळ संपतो.

दुषमा या काळातील मनुष्य व तिर्यच यांचा आहार २०००० वर्षापूर्वीप्रमाणे होतो. याच्या सुरुवातीला शरीराची उंची ३ हात असते. या काळाचे एक हजार वर्ष राहिले असताना १४ कुलकराची उत्पत्ति होते. कुलकर या काळातील पुरुषांना उपदेश करतात.

दुषमासुषमा या काळाच्या सुरुवातीला शरीराची उंची सात हात असते. मनुष्य पाच वर्णाच्या शरीरानी युक्त, मर्यादा, विनय, लज्जासहित संतुष्ट व संपन्न असतो. या काळातच २४ तीर्थकर होतात. या काळातच १२ चक्रवर्ती, ९ बलदेव, ९ नारायण , ६ प्रतिनारायण होतात. या काळाच्या शेवटी मनुष्याच्या शरीराची उंची पाचशे पंचवीस धनुष्य असते.

सुषमादुषमा या काळात मनुष्याची उंची पाचशे धनुष्य समान असते. आयुष्य व शरीराची उंची उत्तरोत्तर वाढतच जाते. यावेळच्या पृथ्वीला जघन्य भोगभूमी म्हणतात. या काळाच्या शेवटी मनुष्याची उंची एक कोस होते

सुषमा या काळाच्या प्रारंभी मनुष्य व तिर्यच यांचे आयुष्य व उंची सुषमादुषमाकाळाच्या शेवटाच्या इतकी असते. तथापि काल स्वभावाप्रमाणे त्यात दिवसेंदिवस वाढ होत जाते. या काळाच्या शेवटी नर-नारी दोन कोस उंचीचे पूर्ण चंद्रमा समान मुखाचे , विनय व शील संपन्नवाले असतात.

सुषमासुषमा या काळातील पृथ्वी उत्तम भोगभूमी म्हणून प्रसिध्द असते. या काळाच्या शेवटी मनुष्याची उंची तीन कोस असते. या काळात मानव सर्व शक्तीनी समर्थ असतो.

अशा प्रकारे अवसर्पिणी व उत्सर्पिणी काल असंख्यात वर्षे झाल्यानंतर एक हुंडावसर्पिणी काळ होतो. त्यात सुषम दुषमा काळाच्या वेळी वर्षा होऊन ऊन पडते , ज्यामुळे विकलेंद्रिय जीवांची उत्पत्ति होते.

## धर्म - परंपरा

जैन मतानुसार भारताच्या इतिहासाला सस्यशामला व द्रुमदलशोभिनी अश अवस्थेतील भारतभूमीच्या वर्णनापासुन सुरवात होते. या सुषमासुषमा काळातील परिस्थितीला पुराणकारांनी 'भोगभूमी' म्हटले आहे. कारण कर्मभूमीतील व्यवस्थेप्रमाणे कृषी व इतर उधोग येथे अस्तित्वात नव्हते. कालक्रमाने या अवस्थेत बदल झाला व एका नव्या युगाला सुरवात झाली. यालाच कर्मभूमी म्हणतात आधुनिक संस्कृतीची सुरवात येथूनच झाली असावी असे म्हणता येते. या युगाचा विकास घडवून आणणाऱ्या चौदा महापुरुषांना कुलंकर , मनु किंवा युगकर्ते असेही म्हणतात. त्यांनी आपआपल्या काळातील लोकांना हिंस्त्र पशुपासून संरक्षण करण्याचे उपाय शिकविले भूमी व वृक्ष यावरील वैयक्तिक मालकी व त्यांच्या सीमा निश्चित केल्या. हत्ती, घोडा इत्यादी पशूंचे पालन करुन वाहनासाठी त्यांचा उपयोग करण्यास शिकविले. शेवटी कृषिव्दारा अन्न निर्माण करण्याची कला शिकविली. व्यापार , शिल्प इत्यादि सर्व कला व उद्योगधंदे त्या पाठोपाठ निर्माण झाले, म्हणूनच ही भूमी कर्मभूमी झाली. चौदा कुलंकरानंतर ज्या पुरुषश्रेष्ठांनी कर्मभूमीच्या सांस्कृतिक युगामध्ये धर्मोपदेशाने व स्वतःच्या चारित्र्यानी पुण्यापापातील भेद शिकविला असे त्रेसष्ट महापुरुष निर्माण झाले. त्यांनाच शलाका पुरुष किंवा विशेष माननीय पुरुष असेही म्हणतात. जैन पुराणातून त्यांचेच चरित्र वर्णन कलेले आढळते . या त्रेसष्ठ शलाका महापुरुषामध्ये २४ तीर्थकर , १२ चक्रवर्ती, ९ बलभद्र, ९ नारायण आणि ९ प्रतिनारायण यांचा समावेश होतो.

**चोवीस तीर्थकर :-** १. ऋषभ, २. अजित ,३. संभव, ४.अभिनंदन, ५. सुमतिनाथ, ६. पद्मप्रभ, ७. सुपार्श्व, ८. चंद्रप्रभ, ९. पुषदंत, १०. शीतलनाथ, ११. श्रेयांसनाथ, १२. वासुपूज्य, १३. विमलनाथ, १४. अनंतनाथ, १५. धर्मनाथ, १६. कुंथनाथ, १७.शांतिनाथ, १८. अरहनाथ, १९. मल्लिनाथ, २०. मुनिसुव्रत, २१. नमिनाथ, २२. नेमिनाथ, २३. पार्श्वनाथ, २४. वर्धमान किंवा महावीर

**बारा चक्रवर्ती :-** २५. भरत, २६. सगर, २७. मधवा, २८.सनत्कुमार,२९. शांतिनाथ , ३०.कुंथुनाथ, ३१. अरहनाथ, ३२. सुभौम, ३३. पद्म, ३४. हरिषेण , ३५. जयसेन, ३६. ब्रह्मदत्त.

**नऊ चक्रवर्ती :-** ३७. अचल, ३८.विजय, ३९.भद्र, ४०. शुप्रभ, ४१.सुदर्शन, ४२. आनंद, ४३.नंदन, ४४. पद्म, ४५. राम.

**नऊ वासुदेव :-** ४६. त्रिपृष्ठ , ४७. व्दिपृष्ठ, ४८. स्वयंभू, ४९. पुरुषोत्तम, ५०. पुरुषसिंह, ५१. पुरुष पुंडरीक, ५२. दत्त, ५३.नारायण, ५४.कृपण.

**नऊ प्रतिवासुदेव :-** ५५. अश्वग्रीव. ५६. तारक, ५७. मेरठ, ५८. मधु, ५९. निशुभ, ६०.बळी, ६१. प्रल्हाद, ६२. रावण व ६३. जरासंध

# •भगवान् ऋषभनाथ•

त्रेसष्ठ शलाका पुरुषामाध्ये भगवान ऋषभनाथ हे पहिले तीर्थंकर होते. कालमानाप्रमाणे सामान्यतः यांच्यापासूनच जैन धर्माचा प्रांरभ झाला असे मानतात. म्हणजे धर्माचा पुनरुध्दार केला. धर्म अनादि निधन व शाश्वत आहे असे जैनमत आहे. भगवान ऋषभदेवांचे १. जयवर्मा, २. महाबल विद्याधार, ३. ललितांग देव, ४. वज्रजंघराजा, ५. भोगभूमीज, ६. श्रीधर, ७. सुविधि ( नारायण ) , ८. अच्युतेंद्र, ९. वज्रनाभि चक्रवर्ती इत्यादि पूर्वभव झाले. शेवटच्या भवात षोडशकारण भावनांच्या बळानेच त्यांना तीर्थकर प्रकृतीचा बंध झाला. त्यानंतर ते सर्वार्थसिध्दि अहमिंद्र झाले. या भवाचा त्याग करुन अयोध्या नगरीतील अंतिम कुलकर नाभिराज व त्यांच्या डाव्या पायावर बैलाचे चिन्ह असल्याने त्यांचे नाव वृषभनाथच पडले. यांचा विवाह यशस्वती व सुनंदा नावाच्या दोन राजकन्याबरोबर झाला. यशस्वती राणीपासून त्यांना भरतादि ९९ पुत्र व ब्राह्मी नावाची कन्या झाली व सुनंदा राणीपासून बाहुबली नावाचा पुत्र व सुंदरी नावाची कन्या झाली.

आपल्या राज्यकाळात त्यांनी प्रजेला असी. मसी. कृषि, वाणिज्य आणि विद्या अशा सहा उपजीविका साधनाचे विशेष रुपाने ज्ञान दिले. देश व नगर त्याचप्रमाणे वर्ण व जाती इत्यादीसंबंधी सामाजिक व्यवस्था रुढ केली. भरत व बाहुबली वगैरे स्वतःच्या शंभर मुलांना ब्राह्मी व सुंदरी या दोन मुलींना त्यांनी समस्त कला विद्या शिकविल्या. एके दिवशी राजसभेमध्ये नृत्य करीत असतानाच नीलांजना नावाची नर्तकी मरण पावली. या दुर्घटनेमुळे ऋषभदेव संसारातून विरक्त झाले. भरताला राज्य देऊन त्यांनी केशलोच केला व सिध्दांना नमस्कार करुन स्वतः मुनिदीक्षा घेतली. सहा महिने ते आत्मध्यानात निमग्न राहिले. एक हजार वर्षे तपस्या केल्यानंतर त्यांना केवलज्ञान प्राप्त झाले. त्यानंतरच्या काळात समस्त देशामध्ये विहार करुन त्यांनी धर्मप्रकार केला. त्यांच्या उपदेशासाठी समवशरण नावाचा विशाल सभा मंडप तयार केला गेला. शेवटी त्यांना कैलास पर्वतावरुन मोक्ष प्राप्ती झाली.

त्यांचा पुत्र भरत याने स्वतः पराक्रमाच्या दिग्विविजयाच्या जोरावर प्रथम चक्रवर्ती पद मिळविले. बाहुबलीने मुनिदीक्षा घेऊन एक वर्ष निराहार तपश्चर्या केली व आदिभगवंताच्या समवसरणात प्रवेश करुन त्यांच्याबरोबर ते बिहार करु लागले. आयुष्य समाप्तीसाठी आघाती कर्माचा क्षय करुन ते मुक्त झाले. भगवान ऋषभनाथांचा पुत्र मरीचिकुमार अनेक भव धारण करुन अंतिम तीर्थकर भगवान महावीर झाले. ऋषभदेवांचे वृषभसेन इत्यादि ८४ गणधर होते. ऋषभनाथ सुषमादुषमा नावाच्या तिसऱ्या काळात जन्मले व मोक्षही तिसऱ्या काळातच झाला. ते मुक्त झाल्यावर ३ वर्षे ८ll महिन्यानी चतुर्थ काळाला सुरवात झाली. समाजाला यांनी क्षत्रिय , वैश्य, शूद्र या तीन विभागात विभाजन करुन जीवननिर्वाह करण्याचा मार्ग दाखविला. त्यामुळेच त्यांना ब्रह्मा किंवा १५व कुलंकरही म्हणण्यात येते.

**ऋषभदेवांचा काळ :-** जैन पुराणामध्ये भगवान ऋषभनाथांचे जीवन व तपश्चर्या, केवलाज्ञानाची प्राप्ती व धर्मोपदेशाचे विहार दत्यादींचे सविसतर वर्णन आढळते. ( जैन लोक या काळापासूनच आपल्या धर्माची उत्पत्ती मानतात.) भगवान ऋषभदेवांच्या काळासंबंधी अनुमान करणे कठीण आहे. जैन पुराणात त्या काळात दीर्घतेचे वर्णन सागरोपम या प्रमाणात केले आहे. सद्‌भाग्याने ऋषभदेवांचे जीवन-चरित्र केवळ जैन

साहित्यामध्येच नव्हे तर, वैदिक साहित्यामध्येही आढळते. भागवत पुराण्याच्या सहाव्या स्कंधातील पहिल्या सहा अध्यायामध्ये ऋषभदेवांचा वंश, जीवन जपश्चर्येचा वृत्तांत वर्णिला आहे. त्या पुराणातील सर्वच मुख्य घटणा जैन पुराणामधील वर्णनाशी सुसंगत आहेत. त्यांच्या आईवडिलांची नावे नाभि व मरुदेवी अशीच आढळतात. शिवाय स्वयंभूमनू, प्रियव्रत, अग्निध्र, नाभि व ऋषभ या क्रमाने स्वयंभूमनूपासून त्यांची पाचवी पिढी मानली जाते. आपला ज्येष्ठपुत्र भरत याला राज्य देऊन त्यांनी संन्यास घेतला. ते नग्न रहात . त्यांच्याजवळ शरीराशिवाय कोणताच परिग्रह नव्हता. लोकांनी विरसकार केला, शिवीगाळ केली, मार दिला तरी ते मौनच रहात. आपल्या कठोर तपश्चर्येने त्यांनी केवलज्ञानाची प्राप्ती करुन घेतली. दक्षिण कर्नाटकपर्यतच्या विविध देशात त्यांनी विहार केला. ते कुडकाचल पर्वतावरील तनामध्ये विवस्त्र विहारु लागले. बांबूच्या घर्षणाने वनास आग लागली व त्यामध्ये ते भस्मसात झाले.

**-भागवत पुराण**

भगवान ऋषभदेवांचे जीवन चरित्र ऐकून कोंक, बैंक व कुटकाचल येथील राजा अर्हन् कलियुगामध्ये त्याच धर्माचे स्वेच्छेने प्रवर्तन करतील. इत्यादी गोष्टींचा उल्लेख भागवत पुराणात आला आहे, या वर्णनावरुन भागवतामधील उल्लेख जैन पुराणामधील भगवान ऋषभ तीर्थकारासंबंधीत आहेत व अर्हन् राजाने प्रवर्तन केलेला धर्म हा ऋषभ धर्म म्हणजे जैन धर्म होय, या विषय संदेह राहत नाहीत. भागवत पुराणाधिक वैद्यिक परंपरेतील अन्य ग्रंथामध्ये ऋषभ देवासंबंधी जे उल्लेख आढळतात त्याचे सखोल संशोधन होणे आवश्यक आहे. आमच्या बाहय शरीरालाच पाहू शकता. यथार्थ आतरस्वरुपाला नाही. या ऋचेबरोबरच ऋगवेदात केशीची स्तुती केली आहे.

केश्यार्ग्नि केशी विशेय केशी विभर्ति रोदसी / केशी विश्वे स्वर्दुशे केशीदं जोतिरुच्यते //

(ऋग्वेद १०,१३६, ९ )

अग्नि जल, स्वर्ग विष व पुथ्वीला केशी मुनी धारण करतो केशी समस्त वैश्विक तत्त्वाचे दर्शन करवितो केशीलाच प्रकाशमान ज्योती म्हणतात. केशीची ही स्तुती वर सांगितलेल्या वातरशना मुनिंच्या वर्णनामध्ये अढळते. यावरुन केशी वातरशना मुनिमध्ये प्रधान वर्ण्यविषम असावेत असे वाटते. ऋग्वेदातील केशी इत्यादी वातरशना मुनींच्या साधना व भगवत पुराणात उल्लेखिलेले वातरशना श्रमण ऋषी, त्यांचे अधिनायक ऋषभनाथ व त्यांच्या साधना यांची परस्पर तुलना करणे योग्य ठरेल. ऋग्वेदीय वातरशना मुनी आणि भागवतातील ‘वातरशना श्रमण ऋषी’ एकाच संप्रदायातील व एकार्थवाची आहेत. केशी याचा अर्थ केशधारी असा आहे. सामणाचार्यानी याचा अर्थ ‘ केशस्थानिय किरण धारण करणारे ’ असा केला आहे त्यातून ‘सूर्य’ असा अर्थ काढला आहे. परंतु त्या सूत्रंगामध्ये ज्यांच्या साधनांचे वर्णन आहे, वातरशना मुनींशी त्याची कोणतीही सर्थकता किंवा संगती लागत नाही, ज्यांच्या साधनेमध्ये मलधारणा, मौनवृत्ती. अत्युत्कट आनंद अशा भावनांचा विशेष उल्लेख आहे, त्या वातरशना मुनिगणांचा केशी हा स्पष्टतःच अधिनायक ठरतो. सुक्तामध्ये त्यांनाच पुढे ‘मुनिर्देव’ देवस्म सौकृत्याय सश्व हितः (ऋग्वेद १०, १३६,४) अर्थात् देवदेवांचे मुनि उपकारी व हितकारी मित्र म्हटले आहे. वातरशना शब्दामध्ये मलरुपी वस्त्र धारण करणे यामध्ये त्याच्या नग्न विहाराचा संकेत आहे. भागवत पुराणातील वृषभाच्या वर्णनाशी याची तुलना करता येईल. ऋग्वेदातील केशीसंबंधीह सूक्त व भागवत पुराणातील ऋषभदेवाचे चरित्र पाहिल्यास पुराणामध्ये ऋग्वेदीय सूक्तावरच विस्तृत भाष्य केले असावे असे दिसते. वातरशना,

इत्यादी रुपाने रजोधारणा हे संयमाचे एक आवश्यक अंग मानले आहे. बुध्दकाळीसुध्दा रजोजल्लीक श्रमण विहार करीत होते. श्रमणांच्या आचारप्रणालीत व्यवस्थितपणा निर्माण करण्यासाठी भ. बुध्दानी सांगितले आहे की, ‘ नाहं भिक्खवे संघाटिकस्स संघाटिधारणमत्तेन सामन्यं वादामि, अचेलकस्स, अचेलकमत्तेन रजोजल्लिकस्स रजोजल्लिकमत्तेन-जटिलकस्स जटाधारणमत्तेन सामान्यं वदामि ( मज्झिमनिकाय ४० ) ’

“ अर्थात हे भिक्षूनों, संघटिकांचे श्रामण्य केवळ संघाटी धारण केल्यामुळेच मी मानीत नाही, अचेलकाचे केवळ अचेलकत्वामुळे, रजोजल्लीकाचे केवळ रजोजल्लीकत्वामुळे आणि जटिलकाचे केवळ जटा धारण करण्यानेही मी श्रामण्य मानीत नाही.” महत्वाचा प्रश्न असा की, “ ज्या वातरशना मुनींचा धर्म स्थापण्यासाठी व रजोजल्लिक वृत्तीने कैवल्यप्राप्ती शिकवण्यासाठी भगवान ऋाषभदेवांचा अवतार झाला होता

असा उल्लेख भारतीय साहित्यात केव्हापासून मिळतो यासाठी वेदग्रंथातील वातरशनामुनींचे उल्लेख पाहणे आवश्यक आहे.

वातरशन मुनीसंबंधी ऋग्वेदीय ऋचामधील त्या मुनींची साधना लक्षात घेण्यासारखी आहे.

मुनयो वातरशनाः विशंणा वसते मला । वातस्यानु घ्राजि यन्ति यद्देवासो अविक्षत ।।
उन्मादिता मौनेयेन वार्ता आतस्थिमा वयम् । शरीरेदस्माकं यूयं मर्तासोः अभिपश्यथः ।।
(ऋग्वेद १०,१३६,२-३)

सामणभाष्याच्या साह्याने या ऋचेचा अर्थ् पुढीलप्रमाणे - अतींद्रियार्थदर्शी वातरशना मुनि मल धारण करतात. त्यामुळे ते पिंगट दिसतात. प्राणोपसनाव्दारे जेव्हा ते वायूची गती धारण करतात, प्राणवायु रोकतात तेव्हा ते आपल्या तपाच्या प्रभावाने प्रदिप्त होऊन देवता स्वरुप मिळवितात. सर्व लौकिक व्यवहार सोडून आम्ही मोनवृत्तीने उन्मत्तवत् किंवा उत्कट आनंदी होऊन वायुस्वरुपाला प्राप्त होतो आणि तुम्ही सामान्य मानव फक्त.

## प्रथम तीर्थंकर व वातरशन मुनी-

भागवतामध्ये उल्लेख आहे की, 'बर्हिषि तस्मिन्नेव विष्णुदत्त भगवान परमर्षिभिः प्रसादितो नाभेः प्रियाचिकीर्षया तदवरोधायने मेरुदेव्यां धर्मान् दर्शयितुकामो वातरशनानां श्रमणानाम् ऋषीणाम् उर्ध्वमन्थिनां शुक्लया तन्वावततार। ' (भा.पु. ५,३,२०) परिक्षित राजाला उद्देशून शुक्राचार्य म्हणतात - हे विष्णुदत्त (परिक्षित) यज्ञामध्ये परम ऋषींनी प्रसन्न केल्यावर स्वतः श्री भगवान विष्णुने नाभिराजाचे प्रिय करणा-या इच्छेने वातरशना उर्ध्वमंथिन् श्रमण ऋषींचा धर्म प्रकट करण्यासाठी श्रमण ऋषींचा धर्म प्रकट करण्यासाठी त्याच्या राणीनिवासामधील मरुदेवीच्या पोटी शुभ जन्म घेतला.

भागवत पुराणतील या विधानातील विशेषतः दोन गोष्टीकडे विशेष लक्ष देणे योग्य आहे. ऋषभदेवांचे भारतीय संस्कृतीमधील स्थान, त्यांचे प्राचीनत्व, साहित्यिक परंपरेशी त्यांचा घनिष्ट व महत्वपूर्ण संबंध इत्यादी कारणासाठी याचा परामर्ष घेणे आवश्यक आहे. ऋषभदेवासंबंधी मान्यता व पूज्यता याबाबतीत जैन व हिंदू यांच्यामध्ये कोणताच मतभेद नाही. जसे ते जैनांचे प्रथम तीर्थंकर आहेत. तसेच हिंदूंच्या दृष्टीने ते साक्षात भगवान विष्णूचेच अवतार आहेत. प्राचीन काळी त्यांच्या ईश्वरावताराची मान्यता इतकी दृढमूल झाली होती की, शिवपुराणात देखील शिवाच्या अठ्ठावीस योगावतारातामध्ये त्यांची गणना केली आहे. (शिवपुराण ७,२,९) प्राचीनत्वाच्या दृष्टीने हा अवतार रामावतार व कृष्णवतार यापेक्षा पूर्वकालीन मानला आहे. भागवत पुराणात या अवतारावा जो हेतू दाखविला आहे त्यावरुन श्रमण धर्माची परंपरा निःसंदेहपणे भारतीय साहित्यातील प्राचीनतम ग्रंथ ऋग्वेदाशी जोडली जाते. वातरशना श्रमण ऋषींचा धर्म प्रस्थापित करणे हाच ऋषभावताराचा हेतू सांगितला आहे. भागवतामध्ये ध्अयमवतारो रजसोपप्लुत कैवल्याप शिक्षणार्थ :। (भा.पु. ५,६,१२) असाही उल्लेख आहे. अर्थात् हा ऋषभ अवतार रजोगुणांनी भारलेल्या लोकांना कैवल्याचे शिक्षण देण्यासाठी होता. या वाक्याचा अर्थ असाही संभवतो की, हा अवतार रजसहित म्हणजे रजोधारण (मलधारण) जीवन पध्दतीने कैवल्याची प्राप्ती कशी करावी याचे शिक्षण देण्यासाठी होता. ! जैन मुनींच्या आचारामध्ये अस्नान, अदंतधावन, मलपरीषह गगन परिधान वृत्ती, केशधारण, कपिशवर्ण, मलधारण , मौन व उन्माद भाव याचे वर्णन दोन्हीतही समान आहे. ऋषभ भगवानांच्या मृदुल केसांची परंपरा जैन मूर्ति-कलेमध्ये प्राचीनतम काळापासून आजपर्यत अखंडपणे आढळते. सर्व तीर्थंकारामध्ये फक्त ऋषभमूर्तीच्याच मस्तकावर कुरळे केस दाखविलेले असतात, तेच त्यांचे प्राचीन व वैशिष्ट्यपूर्ण लक्षण मानले जाते. केसरी व केसरियानाथ हे सर्व शब्द ऋषभनाथवाचकच आहेत. केसरियानाथाला केशर चढविण्याची जी विशेष रुढी आहे ती, नामसादृश्यामुळेच प्रचलित झाली असावी. जैन पुराणमध्येही ऋषभांच्या जटांचा उल्लेख सर्वत्र आढळतो. पद्म पुराणामध्ये (३,२८८) वातोध्दता जटास्वस्थ रेजुराकुलमूर्तमः । व हरिवंश पुराणामध्ये (९,२०४) स प्रलम्वजटाभार भ्राजिष्णु : । अशी वर्णने आढळतात. अशा प्रकारे ऋग्वेदीय केशी व वातरशना मुनी, भागवत पुराणातील ऋषभ व वातरशना श्रमण ऋषी, त्याचप्रमाणे केसरीयानाथ ऋषभ तीर्थंकर आणि त्यांचा निर्ग्रंथ संप्रदाय एकच होत.

केशी व ऋषभ दोन्ही शब्द व्यक्तिदर्शक आहेत. ऋग्वे्दातील १०, १०२, ६ मध्ये ऋषभ व केशी यांचा उल्लेख आला आहे ती ऋचा.

" कर्कदेव वृषभो युक्त आसीद् अवावचीत् सारभिरस्य केशी

दुर्धर्युक्तस्य द्रवतः सहानस ऋच्छन्ति मा मुद्गलरनीम्"

ज्या सूक्तामध्ये ही ऋचा आली आहे, त्यावरच्या निरुक्तीच्या प्रस्वावनेमध्ये " मृद्गलस्य ह्रता गांवः" इत्यादी जो श्लोक उद्धृत केला आहे त्याला अनुसरुन मुद्गल ऋषींच्या गाई चोराने चोरुन नेल्या होत्या. त्यांना परत आणण्यासाठी ऋषीने केशी वृषभाला आपला सारथी नेमला. त्याच्या केवळ आवाजाने त्या गायी पुढे न पळता मागे परत आल्या. सायणाचार्यांनी या ऋचेचे भाष्य करताना प्रथम वृषभ आणि केशी वेगवेगळा दाखविला आहे. परंतु पुन्हा दुस-या प्रकाराने त्याने म्हटले की, " अथवा अस्त्र सारभिः सहायभूतः केशी प्रकृष्ट केशी वृषभः अयावचीत् भ्रशयशव्दयत् "इत्यादी. सायर्णांचा अर्थ् व निरुक्तीत दिलेला कथाप्रसंग भारतीय दार्शनिक परंपरेनुसार लक्षात घेतला तर प्रस्तुत गाथेचा अर्थ पुढीलप्रमाणे प्रतीत होतो " केशी वृषभ हा शत्रुंचा नाश करण्यासाठी नेमलेला मुद्गल ऋषींचा सारथी (विव्दान नेता) होता. त्याचा आवाज ऐकल्याबरोबर जुंपलेल्या दुर्धर रथासह (शरीराबरो्बर) दौडत असलेल्या मुद्गल ऋषींच्या गायी (इंद्रिये) स्तब्ध झाल्या व त्या मोद्गलाकडे (मुद्गलाची स्वात्मवृत्ती) परत वळल्या. म्हणजेच योगधारी, ज्ञानी नेता केशी वृषभांचा धर्मोपदेश ऐकून मुद्गल ऋषींची बहिर्मुख असलेली इंद्रिये अंतर्मुख झाली.

केशी व वृषभ एकार्थवाची असल्याचे समर्थ्न ऋग्वदामुळेच सिध्द होते. ऋग्वेदात उल्लेखिलेल्या वातरशना मुनी, निर्ग्रंथ साधु व त्याचे अधिनामक केशी मुनी व ऋषभदेव हे सर्व एकच ठरल्याने जैन धर्माच्या प्राचीन परंपरेवर फार मोठा महत्वपूर्ण प्रकाश पडतो. वेदाच्या रचनाकाळासंबंधी विव्दानात अनेक मते आहेत.तथापि आधुनिक पाश्चात्य व भारतीय विद्यातज्ञांच्या बहुमताने, वेदाची रचना त्यांच्या वर्तमान स्वरुपावरुन इ.स. पूर्व दीड हजाराच्या सुमारास झाली असावी. चारी वेदातील ऋग्वेद सर्वात अधिक प्राचीन मानला आहे आणि ऋग्वेदीय ऋचातच वातरशना मुनींचा व केशी ऋषभदेवांचा उल्ल्ेख असल्याने जैन परंपरा ही ऋग्वेद परंपरेपे्क्षा वेगळी आहे. कारण वातरशना मुनीप्रमाणे वैदिक ऋषी त्यागी व तपस्वी नाहीत, ते गृहस्थी आहेत. याउलट वातरशना मुनी घरदार, स्त्री-पुरुष, धन-धान्य इत्यादींचा परिग्रहच नव्हे तर देहवस्त्राचाही पूर्णपणे त्याग करुन भिक्षावृत्तीने राहतात. स्नानांदिक शरीर-संस्कारांचा त्याग करुन मपरिषह सहन करतात. मौनाने राहतात. देवतांच्या आराधनारहित आत्मध्यानामध्येच आपले कल्याण समजतात.

उपर्युक्त विश्लेषणावरुन जैन परंपरा ऋग्वेद काळा इतकीच प्राचीन असून, ऋग्वेदातही या परंपरेविषयी स्पष्ट उल्लेख आढळतात व त्या परंपरेचे स्वतंत्र अस्तित्वही दाखविलेले दिसते.

भगवान ऋषभनाथांचे आयुष्य ८४ लाख पूर्व होते. शरीराचा रंग तापविलेल्या सोन्यासारखा होता. शरीर ५०० धनुष्य उंचीचे असून शरीरावर १००८ शुभ लक्षणे होती. त्यांनी २० लाखपूर्व काळ कुमारावस्थेत घालविला, ६३ लाख पूर्व पर्यत राज्यकारभार केला. दीक्षा घेतल्यानंतर १००० वर्ष छद्मस्थ काळ त्यांनी व्यतीत केला व त्यानंतरची १००० वर्ष कमी १ लाख पूर्व आयुष्य समस्त देशात विहार करुन धर्मप्रचार केला. यांच्या काळात भरत हा चक्रवर्ती व भीमवलि हा रुद्र झाला. ऋषभनाथांच्या गणधरांची ८४ संख्या असून ऋषभसेन हे प्रमुख गणधर होते. संघात ३५०००० आर्यिका. ३००००० श्रावक व ५००००० श्राविका होत्या. ब्राम्ही ही मुख्य आर्यिका होती.

भगवान ऋषभनाथ मुक्त झाल्यानंतर ५० लाख कोटी सागर व १ पूर्वांग एवढा काळ व्यतित झ ााल्यानंतर भगवान अजितनाथांचा जन्म झाला. तप्त सोन्याप्रमाणे त्यांच्या शरीराचा रंग होता. त्यांनी १८ लाख पूर्वकाळ कुमारावस्थेत घालविला. राज्यकारभार करण्यात ६३ लाख पूर्व अधिक १ पूर्वांग व्यतित केला. दीक्षा घेतल्यानंतर १२ वर्षे त्यांनी छद्मस्थ काळात घालविली. केवलज्ञान प्राप्त झाल्यानंतर १ पूर्वांग १२ वर्ष कमी १ लाख पूर्व काळ त्यांनी देशातील निरनिराळ्या ठिकाणी विहार केला. यांच्या काळात सगर हे चक्रवर्ती व मुख्य श्रोता व जितशत्रु हे रुद्र होऊन गेले. अजितनाथांच्या गणधरांची संख्या ९० असून केसरिसेन व सिंहसेन हे

मुख्य गणधर होते. संघामध्ये ३२०००० आर्यिका असून प्रकुब्जा मुख्य आर्यिका होती. संघात ३००००० श्रावक व ५००००० श्राविका होत्या.

भगवान अजितनाथ मुक्त झाल्यानंतर ३० कोटी सागर अधिक ३ पूर्वांग एवढा काळ गेल्यानंतर भगवान संभवनाथांचा जन्म झाला. त्यांचे आयुष्य साठ लाख पूर्व वर्षे असून, १५ लाख पूर्व काळ त्यांनी कुमारावस्थेत घालविला. ४४ लाख पूर्व व ४ पूर्वांग काळ त्यांनी राज्यकारभारार्थ व्यतित केला. दीक्षा घेतल्यानंतर १४ वर्षे त्यांनी छद्मस्थ काळ म्हणून घालविला व केवलज्ञान प्राप्तीनंतर १ पूर्वांग १४ वर्षे कमी १ लाख पूर्वकाळ समस्त देशात विहार करुन धर्म प्रचाराचे कार्य केले. त्यांच्या शरीराची उंची ४०० धनुष्य प्रमाण होती. यांच्या काळात सत्यवीर्य हा मुख्य श्रोता होता. यांच्या संघात १०५ गणधर असून चारुदत्त व चारुसेन हे मुख्य गणधर होते. ३२०००० आर्यिका असून धर्मश्री व धर्मार्या मुख्य आर्यिका होत्या. संघात ३००००० श्रावक व ५००००० श्राविका होत्या.

भगवान संभवनाथ मुक्त झाल्यानंतर ९ लाख कोटी सागर अधिक ४ पूर्वांग काळ गेल्यानंतर भगवान अभिनंदननाथी जन्म घेतला. त्यांचे आयुष्य ५० लाख पूर्व असून १२ १/२ लाख पूर्व आयुष्य त्यांनी कुमारावस्थेत, ३६ १/२ लाख पूर्व अधिक ८ पूर्वांग आयुष्य राज्यकारभारात त्यांनी घालविले. दीक्षा घेतल्यानंतर १८ वर्षे त्यांनी छद्मस्थ काळ म्हणून घालविला व केवलज्ञान प्राप्तीनंतर ८ पूर्वांग व १८ वर्षे कमी १ लाखपूर्व काळ निरनिराळ्या देशात विहार करुन धर्म प्रचार केला. त्यांच्या शरीराची उंची ३५० धनुष्य असून शरीराचा रंग सोन्याप्रमाणे पिवळा होता. त्यांचे शरीर सूर्याप्रमाणे तेजोमय होते. यांच्या संघात १०३ गणधर असून वज्रचमर व वज्रनाभी मुख्य गणधर होते. संघात ३३०६०० सामान्य व ३३०००० विशेष आर्यिका होत्या. मेरुषेणा ही प्रमुख आर्यिका होती. ३००००० श्रावक व ५००००० श्राविका होत्या. यांच्या काळात मित्रनाभ हे मुख्य श्रोता होते.

भगवान अभिनंदनांना मुक्ति मिळाल्यानंतर ९०००० कोट सागर ४ पूर्वांग नंतर भगवान सुमतिनाथांचा जन्म झाला. यांचे आयुष्य ४० लाख पूर्व असून त्यांनी १० लाख पूर्व कुमार काळात, २९ लाख पूर्व व १२ पूर्वांग काळ राज्यकारभारात व्यतीत केला. दीक्षा घेतल्यानंतर १२ पूर्वांग व २० वर्षे कमी १ लाख पूर्व त्यांनी समस्त देशात विहार करुन धर्मकार्यार्थ घालविला. त्यांच्या शरीराची उंची ३०० धनुष्य असून, शरीरकांती तप्त सुवर्णाप्रमाणे होती. त्यांचे शरीर फारच सुंदर असून अंगप्रत्यांगामधून लावण्य फुटून निघत होते. यांच्या संघात ११६ गणधर असून वज्र व चमर अमर मुख्य गणधर होते. ३३०००० आर्यिका असून अनंता किंवा अनंतमयी ही मुख्य आर्यिका होती. संघात ३००००० श्रावक व ५०००० श्राविका होत्या. या काळात मित्रवीर्य हा मुख्य श्रोता होता.

भगवान सुमतिनाथाच्या मुक्ततेला ९ कोटी सागर व ४ पूर्वांग लोटल्यानंतर भगवान पद्मप्रभु जन्माला आले. यांचे आयुष्य ३० लाख पूर्व असून त्यांनी ७ १/२ लाख पूर्व कुमारवयात २१ १/२ लाख पूर्व अधिक १६ पूर्वांग राज्यकारभारात काळ व्यतित केला. दीक्षा घेतल्यानंतर ६ महीने छद्मस्थ काळात घालविली व केवल ज्ञान प्राप्तीनंतर १६ पूर्वांग ६ महिने कमी १ लाख पूर्वांग काळात विहार करुन त्यांनी धर्मोपदेश केला. यांच्या संघात १११ गणधर असून चमर व वज्रचमर किंवा चामर मुख्य गणधर होते. ४२०००० आर्यिका असून रतिषेणा मुख्य आर्यिका होती. संघात ३००००० श्रावक व ५००००० श्राविका होत्या. या काळात धर्मविर्य हा मुख्य श्रोता होता.

भगवान पद्मप्रभू मुक्तीनंतर ९०० कोटी सागर अधिक ४ पूर्वांग काळानंतर भगवान सुपार्श्वानाथ जन्माला आले. त्यांचे आयुष्य २० लाख पूर्व असून त्यांनी ५ लाख पूर्व कुमारकाळात १४ लाख पूर्व व २० पूर्वांग राज्यकारभारात व्यतीत केले. दीक्षा घेतल्यानंतर त्यांनी ९ वर्षे छद्मस्थ काळात व केवलीज्ञान प्राप्तीनंतर २० पूर्वांग ९ वर्षे कमी १ लाख पूर्वांग काळात धर्मप्रचार केला. त्यांच्या संघात ९५ गणधर असून बलदत्त किंवा बलिदत्त, बलि, बल हे मुख्य गणधर होते. संघात ३३०००० आर्यिका ३००००० श्रावक व ५००००० श्राविका होत्या. मीना ही मुख्य आर्यिका होती. या काळातील दानवीर्य मुख्य श्रोता होता.

भ. सुपार्श्वनाथानंतर ९० लाख कोटी सागर अधिक ४ पूर्वांग काळ लोटल्यानंतर भगवान चंद्रप्रभूंचा जन्म झाला. यांचे आयुष्य १० लाख पूर्व असून, २ १/२ लाख पूर्व आयुष्य त्यांनी कुमारकाळात घालविले. ६ १/२ लाख पूर्व व २४ पूर्वांग काळ राज्यकारभारात व्यतीत केला. दीक्षा घेतल्यानंतर ३ महिने छद्मस्थ काळात खर्च केला व केवलज्ञान प्राप्त केल्यानंतर २४ पूर्वांग ३ महिने कमी १ लाख पूर्व काळ समस्त देशात विहार करुन धर्मप्रचार केला. त्यांच्या शरीराची उंची एकशे पन्नास धनुष्य होती. त्यांच्या संघात ९३ गणधर असून वैदर्भ दत्तक, दत्त हे मुख्य गणधर होते. संघात ३८०००० आर्यिका. ३००००० श्रावक व ५००००० श्राविका होत्या. वरुणा ही मुख्य आर्यिका होती. यांच्या काळात मधवा हे मुख्य श्रोता होते.

भ. चंद्रप्रभुंच्या मुक्तीनंतर ९ कोटी सागर वजा १/४ पल्य अधिक २८ पूर्वांग कमी १ लाख पूर्व काळानी भगवान पुष्पदंत यांचा जन्म झाला. यांचे आयुष्य २ लाख पूर्व असून त्यांनी ५०००० पूर्व कुमारकाळात, १/२ लाखाचा अधिक २८ पूर्वांग काळ राज्यकारभारात खर्च केला. दीक्षा घेतल्यानंतर ४ वर्षाचा काळ त्यांनी छद्मस्थ काळ घालविला व केवलज्ञान प्राप्तीनंतर २८ पूर्वांग ४ कमी वर्ष कमी १ लाख पूर्व काळ धर्मप्रसारात घालविला. यांच्या संघात ८८ गणधर असून नाग (अनगार) व वैदर्भ, विदर्भ हे मुख्य गणधर होते. संघात ३८०००० आर्यिका, २००००० श्रावक व ४००००० सामान्य व ५००००० विशेष श्राविका होत्या. घोषा ही मुख्य आर्यिका होती. यांच्या काळात बुध्दिवीर्य हे मुख्य श्रोता होते. त्यांच्या शरीराची उंची १०० धनुष्य प्रमाण होती.

भ. पुष्पदंत मुक्तीनंतर १०० सागर अधिक १/२ पल्य अधिक ६६२६००० वर्ष कमी २५००० पूर्व कमी १ कोटी सागर काळ गेल्यानंतर भगवान शीतलनाथ जन्मले. यांचे आयुष्य १ लाख पूर्व असून त्यांनी २५००० पूर्व कुमारकाळात, ५०००० पूर्व राज्यकारभारात व्यतीत केले. दीक्षा घेतल्यानंतर ३ वर्षे त्यांनी छद्मस्थ काळ म्हणून व्यतीत केला. केवलज्ञान प्राप्त झाल्यानंतर ३ वर्षे कमी २५००० पूर्व काळ त्यांनी धर्मप्रचारात घालविला. त्यांच्या संघात ८७ गुणधर असून कुन्थु व अनगार हे मुख्य गणधर होते. संघात ३८०००० आर्यिका, २००००० श्रावक व ४००००० श्राविका होत्या. धरणा ही प्रमुख आर्यिका होती. यांच्या काळात वैश्यानर नावाचा रुद्र असून सीमंधर मुख्य श्रोता होता. त्याची शरीरकांती सुवर्णासमान होती. उंची नव्वद धनुष्य होती.

भ. शीतलनाथांच्या मुक्तीनंतर ३/४ पल्य कमी ५४ सागर अधिक २१ लाख वर्ष काळ गेल्यावर, भगवान श्रेयांसनाथ जन्माला आले. त्यांचे आयुष्य ८२ लाख वर्षे असून, त्यांनी २१ लाख वर्ष कुमारकाळ, ४२ लाख वर्ष राज्यकारभारात व्यतीत केली. दिक्षा घेतल्यानंतर २ वर्षे त्यांनी छद्मस्थ काळात घालविली. केवलज्ञ ाान प्राप्ती झाल्यानंतर २०९९९९८ वर्ष त्यांनी विहार करुन धर्मप्रचार केला. त्यांच्या संघात ७७ गणधर असून, धर्म व कुन्थु हे मुख्य गणधर होते. संघात १३०००० आर्यिका, २००००० श्रावक व ४००००० श्राविका होत्या. चारणा ही प्रमुख आर्यिका होती. यांच्या काळात विजय हे बलदेव. त्रिपृष्ठ हे नारायण, अश्वग्रीव हे प्रतिनारायण व सुप्रतिष्ठ हे रुद्र झाले. त्रिपृष्ठ हे मुख्य श्रोता होते. त्यांची शरीरकांती सुवर्णासमान होती. उंची ऐंशी धनुष्य होती.

भ. श्रेयांसनाथांच्या मुक्तीनंतर १ पल्य कमी ३० सागर अधिक ५४ लाख वर्षानंतर भगवान वासुपूज्य जन्मले. त्यांचे आयुष्य ७२ लाख वर्ष असून, त्यांनी १८ लाख वर्ष कुमारअवस्थेत घालविली. यांनी राज्यत्याग करुन दीक्षा घेतली व १ वर्ष छद्मस्थ काळ व्यतीत केला. केवलज्ञान प्राप्तीनंतर ५३९९९९९ वर्ष त्यांनी विहार करुन धर्मप्रचार केला. त्यांची उंची ७० धनुष्य प्रमाण असून, कुंकुमसमान शरीरकांती होती. त्यांच्या संघात ६६ गणधर असून मंदिर व सुधर्म, धर्म हे मुख्य गणधर होते. त्यांच्या संघात १०६००० आर्यिका २००००० श्रावक व ४००००० श्राविका होत्या. वरसेना ही प्रमुख आर्यिका होती. यांच्या काळात बलदेव अचल, व्दिपृष्ठ हे नारायण, तारक हे प्रतिनारायण व अचल नावाचे रुद्र झाले. स्वयंभु मुख्य श्रोता होते.

भगवान वासुपूज्य यांच्या मुक्तीनंतर ३/४ पल्य कमी ९ सागर अधिक १५ लाख वर्ष गेल्यानंतर भगवान विमलनाथ जन्माला आले. त्यांचे आयुष्य ६० लाख वर्षे असून, १५ लाख वर्षे त्यांनी कुमारावस्थेत व ३० लाख वर्षे राज्यकारभारात घालविली. दीक्षा घेतल्यानंतर ३ वर्षे छद्मस्थ काळ व्यतीत केला. केवलज्ञान

प्राप्तीनंतर १४९९९९७ वर्षे विहार करुन धर्मप्रचार केला. त्यांची शरीरकांती सुवर्णसमान असून उंची ६० धनुष्य प्रमाण होती. यांच्या संघात ५५ गणधर होते व जय, मंदिरार्य, मन्दर हे मुख्य गणधर होते. संघात १०३००० आर्यिका, २००००० श्रावक व ४००००० श्राविका होत्या. पद्मा ही प्रमुख आर्यिका होती. त्यांच्या काळात धर्म नावाचा बलदेव, स्वयंभू नावाचा नारायण, मेरक नावाचा प्रतिनारायण, पुंडरीक नावाचा रुद्र व मुख्य श्रोता पुरुषोत्तम झाला.

भ. विमलनाथांच्या मुक्तीनंतर ३/४ पल्य कमी ४ सागर अधिक ७५०००० वर्षे गेल्यानंतर भगवान अनंतनाि जन्माला आले. त्यांचे आयुष्य ३० लाख वर्षे असून, त्यांनी ७१ लाख वर्षे कुमारावस्थेत, १५ लाख वर्षे राज्यकारभारात घालविली. दीक्षा घेतलयानंतर २ वर्षे छद्मस्थ काळ व्यतीत केला. केवलज्ञान प्राप्तीनंतर ७४९९९८ वर्षे विहार करुन धर्मप्रचार केला. त्यांची शरीरकांती सुवर्णसमान व सर्वलक्षणसहित होती. शरीरउंची ५० धनुष्य प्रमाण होती. त्यांच्या संघात ५० गणधर असून अरिष्ठ व जय हे मुख्य गणधर होते. संघात १०८००० आर्यिका, २००००० श्रावक व ४००००० श्राविका होत्या. सर्वश्री ही प्रमुख आर्यिका होती. यांच्या काळात सुप्रभ नावाचा बलदेव, पुरुषोत्तम नावाचे नारायण, मधुकैटभ नावाचे प्रतिनारायण, अजितंधर नावाचे रुद्र व मुख्य श्रोता पुरुष पुंडरिक झाले.

भगवान अनंतनाथांच्या मुक्तीनंतर १ पल्य कमी ३ सागर अधिक २५०००० वर्षे गेल्यानंतर भगवान धर्मनाथ जन्माला आले. त्यांचे आयुष्य १० लाख वर्षे असून, त्यांनी २ १/२ लाख वर्षे कुमारकाळात, ५ लाख वर्षे राज्यकारभारात व्यतीत केली. दीक्षा घेतल्यानंतर १ वर्ष त्यांनी छद्मस्थ काळ घालविला. केवलज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी २४९९९९ वर्षे विहार करुन धर्मप्रचार केला. त्यांची शरीरकांती सुवर्णसमान असून उंची एकशे ऐंशी धनुष्य प्रमाण होती. यांच्या संघात ४३ गणधर असून सेन व अरिष्ठसेन हे मुख्य गणधर होते. संघात ६२४०० आर्यिका, २००००० श्रावक व ४००००० श्राविका होत्या. सुव्रता ही मुख्य आर्यिका होती. या काळात सुदर्शन नावाचे बलदेव, पुरुषसिंह नावाचा नारायण, निशुम्भ नावाचा प्रतिनारायण, अजितनाभि नावाचा रुद्र व मुख्य श्रोता सत्यदत्त झाले.

भगवान धर्मनाथाच्या मुक्तीनंतर १/२ पल्य अधिक १२५० वर्षानी भगवान शांतीनाथ जन्माला आले. त्यांचे आयुष्य १ लाख वर्षे असून, २५००० वर्ष कुमारावस्थेत ५०००० मंडलेश व चक्रवर्ती म्हणून राज्य कारभारात त्यांनी घालविली. दीक्षा घेतल्यानंतर १६ वर्षे छद्मस्थ काळ व्यतीत केला. केवलज्ञान प्राप्तीनंतर २४९८४ वर्षे समस्त देशात विहार करुन धर्म प्रचार केला. त्यांच्या धर्म संघात ३६ गणधर असून चक्रायुध हा मुख्य गणधर होता. संघात ६०३०० आर्यिका २००००० श्रावक ० ४००००० श्राविका होत्या. हरिषेणा ही प्रमुख आर्यिका होती. या काळात पीठ नावाचा रुद्र, कुनाल हा मुख्य श्रोता होता.

भ. शांतिनाथांच्या मुक्तीनंतर १/४ पल्य कमी ९९९९९९७२५० वर्षानी भगवान कुथुंनाथ जन्माला आले. त्यांचे आयुष्य ६५००० वर्षे असून त्यांनी २३७५० वर्षे कुमारावस्थेत व २३७५० मंडलेश व २३७५० चक्रवर्ती म्हणून राज्यकारभारात व्यतीत केली. दीक्षा घेतल्यानंतर १६ वर्षे छद्मस्थ काळ घालविला. केवल ज्ञान प्राप्तीनंतर २३७३४ वर्षे त्यांनी विहार केला. ३५ धनुष्य प्रमाण उंचीचे त्यांचे शरीर सुवर्ण समान होते. यांच्या संघात ३५ गणधर असून स्वयंभू हे प्रमुख गणधर होते. संघात ६०३५० आर्यिका, १००००० श्रावक व ३००००० श्राविका होत्या. भाविता ही प्रमुख आर्यिका होती. या काळात नारायण हा मुख्य श्रोता होता.

भगवान कुथुंनाथाच्या मुक्तीनंतर ९९९९९६६१०० वर्षानी भगवान अरनाथ जन्माला आले. त्यांचे आयुष्य ८४००० वर्षे असून २१००० वर्षे काळ त्यांनी कुमारावस्थेत व २१००० मंडलेश व २१००० वर्षे चक्रवर्ती म्हणून राज्यकारभार व्यतीत केला. दीक्षा घेतल्यानंतर १६ वर्षे छद्मस्थ काळात व्यतीत केली. केवलज्ञान प्राप्तीनंतर २०९८४ वर्षे त्यांनी विहार करुन धर्मप्रचार केला. त्यांची शरीरकांती सुवर्णसमान असून उंची ३० धनुष्य प्रमाण होती. पायावर मत्स्याचे चिन्ह होते. यांच्या संघात ३० गुणधर असून कुम्भ व कुन्थु हे मुख्य गणधर होते. संघात ६०००० आर्यिका, १००००० श्रावक व ३००००० श्राविका होत्या. कुन्थुसेना व यंक्षिता या

मुख्य आर्यिका होत्या. या काळात सुभौम हा मुख्य श्रोता होता. सुभौम नावाचा चक्रवर्ती, नंदी नावाचे बलदेव, पुंडरीक नावाचे नारायण, बली नावाचे प्रतिनारायण  झाले.

भगवान अरनाथांच्या मुक्तीनंतर ५४४७४०० वर्षानी भगवान मल्ल्रीनाथ जन्माला आले. त्यांचे आयुष्य ५५००० वर्षे असून त्यांनी १०० वर्षे कुमारावस्थेत घालविली. राज्यत्याग करुन दीक्षा घेतल्यानंतर त्यांनी ६ दिवसाचा काळ छद्मस्थकाळ व्यतीत केला. केवलज्ञान प्राप्तीनंतर ६ दिवस कमी ५४९०० वर्षे त्यांनी विहार करुन धर्मप्रचार केला. यांची शरीरकांती सुवर्णासम असून उंची २५ धनुष्य प्रमाण होती. त्यांच्या संघात २८ गणधर असून विशाख हे प्रमुख गणधर होते. संघात ५५००० आर्यिका, १००००० श्रावक, ३००००० श्राविका होत्या. मधुसेना मुख्य आर्यिका होती. याकाळात पद्म हे चक्रवर्ती, नंदिमित्र हे बलदेव, पुष्पदंत हे नारायण प्रहरण हे प्रतिनारायण झाले.

भगवान मल्लिनाथांच्या मुक्तीनंतर ६०५००० वर्षानी भगवान मुनिसुव्रतनाथ जन्माला आले. त्यांचे आयुष्य ३०००० वर्ष असून त्यांनी ७५०० वर्षे कुमारावस्थेत, १५००० वर्षे राज्यकारभारात व्यतीत केली. दीक्षा घेतल्यानंतर ११ मासाचा छद्मस्थ काळ घालविला. केवलज्ञान प्राप्तीनंतर ७४६६ वर्ष व १ महिना समस्त देशात विहार करुन त्यांनी धर्मप्रचार केला. यांचे शरीर नीलवर्ण असून उंची २० धनुष्य प्रमाण होती. यांच्या संघात १८ गणधर असून मल्लि हा प्रमुख गणधर होता. संघात ५०००० आर्यिका, १००००० श्रावक व ३००००० श्राविका होत्या. पूर्वदत्ता ही प्रमुख आर्यिका होती. या काळात हरिषेण नावाचा चक्रवर्ती झाला. भगवान राम हा बलदेव झाला. लक्ष्मण हा नारायण झाला व रावण हा प्रतिनारायण झाला. भगवान राम मोक्षाला गेले व लक्ष्मण नरकात गेला.

भगवान मुनिसुव्रतनाथांच्या निर्वाणनंतर ५०१८०० वर्षानी भगवान नमिनाथ झाले. वतस देशातील कोशांबी नगरात सिध्दार्थ् नावाचा इक्ष्वाकु वंशी राजा राज्य करीत होता. एके दिवशी त्याने महाबल केवलीचा उपदेश ऐकला व त्या उपदेशामुळे त्यांच्या मनात वैरागय निर्मिती झाली. मुनी दीक्षा घेऊन तपस्या करण्यास त्यानी सुरुवात केली व दर्शन विशुध्दि दत्यादी सोहा भावनांच्याव्दारे त्यांनी तीर्थंकर प्रकृतीचा बंध केला. आयुष्याच्या शेवटी समाधिमरण स्वीकारले. अपराजित नावाच्या विमानात ते अहमिन्द्र झाले. तेथे त्यांनी ३३ सागर आयुष्य व्यतीत केले. त्यानंतर मिथ्रीला नगरीत इक्ष्वाकु वंशीय काश्यप गोत्रीय महाराज विजयची राणी वप्पिलेच्या पोटी २१ वे तीर्थंकर नमिनाथांच्या स्वरुपात त्यांचा जन्म झाला. त्यांचे आयुष्य दहा हजार वर्षे असून, शरीर उंची १५ धनुष्य प्रमाण होती. शरीरकांती सुवर्णासमान असून नीलकमल चिन्ह होते. त्यांनी २५०० वर्षे कुमार काळात व ५००० वर्षे राज्यकारभारात व्यतीत केली. पूर्व भवाचे स्मरण होऊन त्यांच्या मनात वैराग्य निर्माण झाले. मुनी दीक्षा घेऊन ९ वर्षे तपस्या केल्यानंतर त्यांना केवलज्ञानप्राप्ती झाली. केवलज्ञान प्राप्तीनंतर २४९१ वर्षे त्यांनी समस्त देशात विहार करुन धर्मप्रचाराचे कार्य केले. यांच्या संघात १७ गणधर असून सुप्रभ सोमक हे गुणधर प्रमुख होते. संघात ४५००० आर्यिका, १००००० श्रावक, ३००००० श्राविका होत्या. मार्गिणी ही प्रमुख आर्यिका होती. भ. नमिनाथांच्या वेळी जयदेव चक्रवर्ती होता.

भ. नमिनाथ मिथिलेचे राजे होते. हिंदुपुराणामध्येही त्यांना जनक राजाचे पूर्वज मानले आहे. नाभिराजाच्या प्रव्रज्येचे एक सुंदर वर्णन उत्तराध्यन सूत्राच्या नवव्या अध्ययात उपलब्ध आहे. वैदिक व बौध्द परंपरेच्या संस्कृत व पाली साहित्यामध्ये जयांचा प्रतिध्वनी आढळतो, अशीच वाक्ये या ठिकाणी नाभिराजाच्या तोंडी ग्रथित केली आहेत व भारतीय अध्यात्मासंबंधी निष्क ाम कर्म व अनासक्ति भावना स्पष्ट करण्यासाठी सर्वोत्कृष्ठ वचन म्हणून याच शब्दावलीचा उल्लेख जेथे आढळतो

सुहं वसामो जीवामो जेसि मो णत्थि किंचण । मिहिलाए उऽझमाणीए ण मे उज्झइ किंचण ।।

(उत्तरायण सूत्र ९-१४)

सुमुखं वत जीवाम येसं नो नत्थि किंचण । मिथिलाये दहमानाय न मे किंचि अदह्यार्थ ।।

(पाली महाजनक शतक)

मिथिलायां प्रदीप्तायां न मे किंचन दह्यते (म.भा. शांतीपर्व ) नमिनाथांची हीच अनासक्त वृत्ती मिथिला राजवंशामधील जनक राजापर्यत आढळते. असे वाटते की, जनककुळातील या अध्यात्मिक परंपरेमुळे तो वंश व तो देश देखील विदेह (जीवन्मुक्त, देह-निर्मोह) नावाने प्रसिध्द पावला. त्यांच्या या अहिंसात्मक प्रवृत्तीमुळेच क्षात्रवृत्तीने प्रतीकमात्र त्यांचा धनुष्य प्रत्यंचाररहित स्वरुपात आढळतो.

भगवान नमिनाथांच्या निर्वाणानंतर ८४३८० वर्षानी भगवान नेमिनाथ जन्माला आले. जंबूव्दीपवर्ती पश्चिम विदेह क्षेत्रात सीता नदीच्या उत्तर तटावर सुगन्धिल देश आहे. तेथे सिंहपुर नगरात यशस्वी, प्रतापी सौभाग्यशाली राजा अपराजित राज्य करीत होता. त्याला एके दिवशी दोन विद्याधर मुनींनी येऊन प्रबुध्द केले की, तुझे आयुष्य केवळ एक महिना राहिले आहे काही आत्मकल्याण कर. हे जाणून अपराजित मुनि झाला. मुनि होऊन त्याने खूप तपश्चर्या केली. आयुष्याच्या शेवटी समाधिकरण स्वीकारुन सोळाव्या स्वर्गाचा इंद्र झाला. तेथुन तो हस्तिनापुरचा राजा श्रीचंद्रचा पुत्र सुप्रतिष्ठ झाला. राज्य करताना एक दिवस पडणारी आकाशातील वीज त्याने पाहिली. जीवनातील क्षणभंगुरतेच्या जाणीवेनी त्यानी मुनिव्रत स्वीकारले. मुनि अवस्थेत त्यानी तीर्थंकर प्रकृतीचा बंध केला. आयुष्याच्या शेवटी एक महिना संन्यास धारण करुन जयंत नावाच्या अनुत्तर विमानात तो अहमिंद्र झाला. तेथे तेहतीस सागर आयुष्य व्यतीत केल्यानंतर २२ वे तीर्थंकर नेमिनाथांच्या स्वरुपात यांनी जन्म घेतला.

भगवान नेमिनाथांचे शरीर नीलकमलाप्रमाणे निळ्या वर्णाचे असून, एक हजार वर्षाचे आयुष्य होते. शरीराची उंची दहा धनुष्य प्रमाण होती व पायावर शंखाचे चिन्ह होते. त्यांची वंशपरंपरा पुढीलप्रमाणे आहे. शौरिपुरचा यादववंशी राजा अंधकवृष्णी याचा जेष्ठ पुत्र समुद्रविजय होता. समुद्रविजयाची महाराणी शिवादेवी होती. तिच्यापोटी नेमिनाथांचा जन्म झाला. अंधकवृष्णीचा कनिष्ठ पुत्र वसुदेव होता. त्याचा मुलगा वसुदेव कृष्ण होय. यावरुनच नेमिनाथ व कृष्ण चुलत भाऊ आहेत. जरासंधाच्या छळामुळे यादव त्रस्त झाल्याने शौरिपूर सोडून व्दारकेत जाऊन राहिले. गिरीनगरच्या उग्रसेन राजाची मुलगी राजमती बरोबर नेमिनाथांचा विवाह निश्चित करण्यात आला. नेमिनाथांची वरात वधूच्या घरी पोहचली. त्यावेळी ठिकठिकाणाहून येणा-या पाहुण्यांना मेजवानी देण्यासाठी कोंडून ठेवलेल्या पशूंना नेमिनाथांनी पाहिले. त्यावेळी त्यांच्या मनात कारुण्याची भरती आली व हिंसामय गृहस्थाश्रमापासून विरक्त होऊन त्यांनी विवाहाचा विचार रद्द केला. गिरनार पर्वतावर जाऊन ते तपश्चर्येमध्ये निमग्न झाले. राजमती आर्यिका झाली. ५६ दिवस तप केल्यानंतर भगवान नेमिनाथांना केवलाज्ञान प्राप्त झाले. केवलज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी ६९६ वर्ष १० महिने व ४ दिवस श्रमण परंपरेचे प्रवर्तन केले. नेमिनाथांच्या या परंपरेला विशेष महत्व आहे. त्यांनी अहिंसेला धार्मिक आचारात मूलस्थान देऊन त्याचे सैध्दांन्तिक स्वरुप प्रस्थापित केले. महाभारताचा काळ इ.स.पू. सुमारे एक हजार वर्षाचा मानतात. यास्तव भगवान नेमिनाथ तीर्थंकराचा काळही हाच काळ मानणे उचित होईल. महाभारताच्या शांतीपर्वात भगवान तीर्थवित् व त्यांनी दिलेला उपदेश यासंबंधी जो वृत्तांत दिला आहे तो जैन तीर्थंकरांनी उपदेशिलेल्या धर्माच्या स्वरुपाप्रमाणेच आहे. भगवान नेमिनाथांचे ११ गुणधर असून वरदत्त हा प्रमुख गणधर होता. त्यांच्या संघात ४०००० आर्यिका, १००००० श्रावक व ३००००० श्राविका होत्या. यक्षिणी ही प्रमुख आर्यिका होती. याच्या काळात ब्रह्मदत्त नावाची चक्रवर्ती , पद्म नावाचा बलदेव, कृष्ण नावाचा नारायण, जरासंध हा प्रतिनारायण व मुख्य श्रोता उग्रसेन होता.

**भ. पार्श्वनाथ**

पूर्वभव भारतातील पोदनपुरा राजा अरविंद असून त्याचा विव्दान सदाचारी मंत्री मरुभती होता. त्याची पत्नी वसुंधरा सुंदर असून मरुभूतीचा दुराचारी बंधू कमठ तिच्यावर आसक्त होता. मरुभती बाहेर गावी गेलेला पाहून त्याने मरुभूतीच्या पत्नीचा शीलभंग केला. राजा अरविंदला जेव्हा हा दुराचार

समजला तेव्हा त्यानी कमठाचे मुख काळे करुन, त्याला गाढवावर बसवून राज्याबाहेर हाकलून दिले. कमठ एका तपस्याच्या आश्रमाशेजारी जाऊन एक मोठा दगड हातावर घेऊन तप करु लागला. मरुभूती त्याला भेटावयास येतो हे पाहताच त्याने वरुन दगड फेकला त्यामुळे मरुभूती मरण पावला.

दुस-या भवात मरुभूती हत्ती व कमठ सर्प झाला. पूर्ववैर आठवून त्याने हत्तीला दंश केला. हत्तीने ते सहन करुन तो स्वर्गात गेला व कमठ नरकात गेला. मरुभूतीचा जीव १६ सागर स्वर्गात राहून पुढे विदेहातील विद्याधरचा पुत्र रश्मिवेग झाला. कमठ तेथेच अजगर बनला.रश्मिवेगाने यौवनावस्थेत मुनि-दीक्षा घेतली. कमठाने पूर्ववैर स्मरुन त्याला खाऊन टाकले. रश्मिवेग सोळाव्या स्वर्गात देव झाला. कमठ सहाव्या नरकात गेला, पुढील भवात मरुभूतीचा जीव विदेह राजा व्रजवीर्यचा पुत्र व्रजनाभि झाला. दिग्विजयाने त्याने सम्राट पद मिळविले. बराच काळ राज्य उपभोगून तो मुनि बनला. कमठ भिल्ल झाला. दिग्विजयाने त्याने वैरामुळे मुनीला मारुन टाकले. पुढील भवात मरुभूतीचा जीव अयोध्येचा राजा व्रजबाहूचा आनंद नावाचा पुत्र बनला. बराच काळ राज्य करुन त्याने मुनि-दीक्षा घेतली. कमठ सिंह बनला व आनंदमुनीचे भक्षण केले. मुनि प्राणत स्वर्गात इंद्र झाला तर कमठ शम्बर नावाचा असुर देव झाला.

मरुभूतीच्या जीवाने पुढील भवात इक्ष्वाकुवंशी राजा अश्वसेन व राणी वामादेवी यांच्या पोटी २३ वा तीर्थंकर पार्श्वनाथ म्हणून जन्म घेतला. भगवान नेमिनाथानंतर त्र्याऐंशी हजार सातशे पन्नास वर्षानी भगवान पार्श्वनाथांचा जन्म झाला. त्यांचे आयुष्य १०० वर्षाचे असून, शरीर हरित रंगाचे होते. शरीराची उंची नऊ हात असून, पायावर सर्पाचे चिन्ह होते. वयाच्या तेविसाव्या वर्षी गृहत्याग करुन त्यांनी सम्मेदशिखर पर्वतावर तपश्चर्या केली. केवलज्ञान प्राप्त झाल्यानंतर वयाच्या सत्तर वर्षापर्यंत त्यांनी श्रमण धर्माचा उपदेश व प्रचार केला. जैन पुराणानुसार त्यांचा निर्वाण काळ भगवान महावीरनिर्वाण काळापूर्वी दोनशे पन्नास वर्ष आहे. म्हणजे हा काळ इ.स.पू. (५२७+२५०=७७७) ठरतो. पार्श्वनाथांचा श्रमण परंपरेवर मोठा प्रभाव आहे. आजही जैन समाज पार्श्वनाथांचा अनुयायी मानला जातो. ऋषभनाथांची सर्वस्व अकिंचन त्यागरुप मुनिवृत्ती,नमीची निरीच्छता व नेमिनाथांची अहिंसा यांना आपल्या चातुर्यायरुप सामाजिक धर्मात सामावून घेतले. जैन आगमाप्रमाणे सर्व प्राणतिक्रमविरमण, सर्व मृषावाद विरमण, सर्व अदत्तादान विरमण, सर्व बहिस्थादान विरमण असे पार्श्वप्रणित चार याम होते. पार्श्वनाथांचा चातुर्ययरुप सामाजिक धर्म महावीरांच्या पूर्वी प्रचलित होता, दिगंबर व श्वेतांबर परंपरेशिवाय पाली साहित्यातही तद्विषयक स्पष्ट उल्लेख आहेत. महावीरपूर्व तीर्थंकरांनी सामायिक संयमाचा आदेश दिला होता व फक्त दोष घडल्यावरच प्रतिक्रमण करणे आवश्यक मानले होते. परंतु महावीरांनी सामाजिक धर्माऐवजी छेदोपस्थापना संयमाची योजना केली व प्रतिक्रमण नियमितपणे करण्याचा आदेश दिला. हीच गोष्ट भगवती उत्तराध्ययन (२०,८,६७५,२५,७,१८५) इत्यादी आगमामध्ये व तत्वार्थसूत्रावरील सिध्दसेनीय टीकेमध्ये (९,१८) आढळते. बौध्द ग्रंथ अंगुत्तरनिकाय, चतुक्कनिपात (वग्ग ५) व त्यातील अट्टकथामध्ये गौतम बुध्दाचा काका 'वप्पशावन' निर्ग्रंथ श्रावक होता असा उल्लेख आहे. याप्रमाणे पार्श्वनुयायी व निर्ग्रंथ श्रावक यांच्यासंबंधी आणखीही काही उल्लेख मिळतात. यावरुन निर्ग्रंथ धर्माचे अस्त्वि बुध्दपूर्व काळात निश्चितपणे होते.

पार्श्वनाथांच्या पूर्वी होऊन गेलेले जैन तीर्थंकर व जैन धर्म यांचे तत्कालीन अस्तित्व पाश्चात्य विव्दानाना मान्य नव्हते. तथापि जर्मन विव्दान हर्मन याकोबीनी बौध्द व जैन साहित्याचे सूक्ष्म अवलोकन करुन निर्ग्रंथ धर्माचे अस्तित्व महावीर पूर्वीही असल्याचे सिध्द केले. तेव्हापासून इतरही विव्दान पार्श्वनाथांना ऐतिहासिक व्यक्ती मानू लागले व त्यांचा निर्वाणकाळ महावीरपूर्व अडीचशे वर्ष आहे या जैन परंपरेला मान्यता मिळाली. पार्श्वनाथांच्या संघात १० गणधर असून, स्वयंभू हा प्रमुख गणधर होता. यांच्या संघात ३८००० आर्यिका, १००००० श्रावक व ३००००० श्राविका होत्या. सुलोका ही प्रमुख आर्यिका होती. यावेळी महासेन हा मुख्य श्रोता होता. शेवटी संमेदशिखरावर त्याना मोक्ष प्राप्त झाला.

**भगवान वर्धमान महावीर**

भगवान पार्श्वनाथांच्या निर्वाणानंतर २१०४२ वर्षांनी भगवान महावीरांचा जन्म झाला. महावीरांचे वडील सिध्दार्थ कुंडपुरीचे राजे होते तर त्यांच्या मातेचे नाव त्रिशलादेवी होते. त्यांचे पैतृक गोत्र,ज्ञाता, नाय-नाद्य-नात असल्याने, पाली ग्रंथात त्यांचा उल्ल्ेख नात-पुत्र असाही केलेला आहे. वयाच्या तीस वर्षापर्यंत कुमार व अविवाहित अवस्थेत राहून त्यांनी दीक्षा घेतली. दीक्षेच्या वेळी त्यांनी सर्व वस्त्रांचा त्याग केला. बारा वर्षाच्या तपश्चर्येनंतर ऋजुकूला नदीच्या किनारी त्यांना केवलज्ञान प्राप्त झाले. यानंतरची तीस वर्षे निरनिराळ्या प्रदेशात विहार, तेथील लोकांना उपदेश करुन त्यांनी आपल्या तीर्थाची प्रस्थापना केली.भगवान महावीरांचा निर्वाण बाहत्तराव्या वर्षी पावापुरीजवळ झाला.

भगवान महावीरांचे पाच लाख अनुयायी असून तत्कालीन निरनिराळे सत्ताधीश त्यांचे उपासक बनले होते. त्यांनी आपलया अनुयायांचे मुनि, आर्यिका, श्रावक व श्राविका असे चार विभाग केले. मुनि आर्यिका गृहत्याग करणारे परिव्राजक होते तर श्रावक-श्राविका गृहस्थी होते, चतुर्विध संघात मुनि व गृहस्थ धर्माची त्यांनी वेगवेगळी व्यवस्था केली. अहिंसा धर्माला मूलाधार मानून त्याचीच विस्ताररुपाने अहिंसा, अमृषा, अचौर्य, अमैथुन व अपरिग्रह अशा पाच व्रतामध्ये स्थापना केली. मुनींना या व्रताचे पालन आवश्यक मानून त्यांच्या व्रताला महाव्रते व गृहस्थासाठी स्थूलरुपाने अणुव्रताची योजना केली. आचार-दोष व अपराध यांच्या निवारणार्थ त्यांनी नियमित प्रतिक्रमणावर जोर दिला.

भगवान महावीरांच्या निर्वाणानंतर जैन संघाचे प्रमुखत्व त्यांचे मुख्य गणधर इंद्रभूती गौतमांना मिळाले. भगवान महावीरांचे शिष्य होण्यापूर्वी ते एक महान वेद शास्त्रज्ञ प्रकांड ब्राह्मण पंडित होते. महावीरांच्या उपदेशाला श्रृखलाबध्द व्यवस्थित व वर्जीकृत स्वरुपात संकलित करण्याचे श्रेय यांनाच आहे. बौध्दधर्म संस्थापक गौतम बुध्द व न्यायसूत्रकार अक्षयपाद गौतमाच्या समकालीन असूनही ते या दोघापासून भिन्न होते. ते अर्हत केवली असून महावीर संवत १२ (इ.स.पू. ५१५) मध्ये त्यांना निर्वाण प्राप्ती झाली. त्यांच्या पश्चात सुधर्माचार्य संघनायक झाले. हेही अर्हत केवली होते व त्यांना महावीर संवत २४ (इ.स.पू. ५०३) मध्ये निर्वाण प्राप्ती झाली. त्यानंतर जंबू स्वामी संघनायक झाले. ते चंपानगरीतील एका कोट्याधीश श्रेष्ठीचे पुत्र होते व महावीरांच्या प्रभावामुळे त्यांचे शिष्य बनले होते. मथुरेच्या चौरासी नावाच्या ठिकाणी त्यांनी तपश्चरण केले. महावीर संवत ६२ (इ.स.पू.४६५) ला त्यांना निर्वाण प्राप्ती झाली. महावीरांच्या शिष्य-परंपरेतील जंबू स्वामी अंतिम केवली होते. मथुरा व शूरसेन देशात यांनी जैन धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार केला.

त्यानंतरच्या काळात विष्णुकुमार, नंदिमित्र, अपराजित, गोवर्धन व भद्रबाहु यांनी क्रमशः जैन संघाचे नेतृत्व केले. हे पाचही श्रुतकेवली असून त्यांचे श्रुतज्ञान यथावत होते. अंतिम श्रुतकेवली भद्रबाहूना इ.स.पू. ३६५ (महावीर संवत १६२) मध्ये स्वर्ग-प्राप्ती झाली. जैन धर्माच्या परंपरागत इतिहासामध्ये या आचार्यांना फार महत्वपूर्ण स्थान आहे. यांच्या काळापर्यंत जैन धर्म अखंड अविभक्त स्वरुपात कायम होता. तथापि यांच्या मृत्यूच्या पश्चात साधुमध्ये मतभेद, पंथभेद, देशभेद, आचारभेद निर्माण झाले. भगवान महावीरानी उपदेशिलेले अंगपूर्व पूर्णज्ञान या काळापर्यंत अविच्छिन्न राहिले. तथापि पुढील काळात हलके हलके ते विच्छिन्न होण्याला सुरुवात झाली. हे ज्ञान गुरुशिवाय परंपरेत मुखोद्गत करण्याच्या पध्दतीने दिले जात होते व या पध्दतीने कित्येक शतके हे ज्ञान एका पिढीकडून दुस-या पिढीला मिळत आलेला होते.

जैन संघात मतभेद निर्माण होण्याला मध्यदेशामध्ये पडलेला बारा वर्षाचा मोठा दुष्काळ कारणीभूत होय. आपल्या ज्ञानामुळे या संकटाची पूर्वसूचना मिळाल्याने भद्रबाहु आपल्या सहस्त्र शिष्यासह दक्षिण भारतात विहार करीत आले. दुर्भिक्ष संपलयानंतरही या साधूपैकी बरेचशे साधू दक्षिणेतच कायम स्वरुपात राहिले. जैनधर्म येथे अगोदरपासूनच प्रचलित होता. या नवागतांच्या आगमनामुळे तो आणखीच प्रसारित झ ाला.कर्नाटकामधील 'श्रवणबेळगोळ' नावाच्या ठिकाणाला मुख्य केंद्र बनवून हा दक्षिणीय निर्ग्रंथ श्रमणसंघ दक्षिण भारतातील विभिन्न प्रदेशात तसेच भारतीय महासागरवर्ती व्दीपामध्येही जैन धर्माचा प्रसार व प्रचार करण्यात कार्यमग्न झाला. या संघाचा कालक्रमानुसार दिवसेंदिवस विकासच होत गेला.

याचवेळी कित्येक साधू मगधातच राहिले होते. तथापि दुर्भिक्षाच्या दुर्दिनामध्ये ते आपल्या आगमानुकूल कठोर आचार-विचारांचे, संयमाचे पालन करु शकले नाहीत. विविध प्रकारच्या शिथिलाचाराला सुरुवात झाली. आचार्य स्थूलभद्रांनी त्यांचे नेतृत्व केले. तथापि वाढत्या शिथिलाचाराला व ज्ञानाच्या -हासाला ते रोखू शकले नाहीत. कालांतरानी या मगध शाखेच्या साधूनी पाटलीपुत्राचा परित्याग करुन उज्जैनीला आपले केंद्र बनविले व त्यानंतरच्या काळात येथूनही आणखी पश्चिमेला जाऊन सौराष्ट्रमधील वल्लभपूरला त्यांनी आपले कायम स्थान प्रस्थापित केले. या शाखेचेच साधू इ.स. च्या प्रथम शतकाच्या शेवटी श्वेतांबर संप्रदायाचे जनक बनले. या दोन शाखाशिवाय उत्तर हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागात अजूनही अनेक साधू होते. त्यातील अनेकांनी मथुरा शहराला आपले प्रमुख स्थान बनविले व त्याचा विकासही स्वतंत्र प्रकारानी केला.

अशाप्रकारे भगवान महावीरांच्या निर्वाणानंतर जैन संघाची कायम स्वरुपात प्रगती, विकास होत राहिला.या काळात अनेक दोष, पंथभेद निर्माण झाले तरीही तीर्थंकराच्या मौलिक विचारांचा प्रसार देशविदेशात वाढतच गेला.

त्यामुळेच इतिहास काळाच्या सुरुवातीपासून म्हणजे मगध साम्राज्याच्या उत्कर्षापासून ते भारतीय स्वातंत्र्यापर्यंत भारतात (उत्तर-दक्षिण) जैनधर्माचा प्रसार, प्रचार कसा होत गेला, या धर्माची तीर्थक्षेत्र कशाप्रकारे निर्माण झाली, निरनिराळया घराण्यानी व त्या घराण्यातील सत्ताधीशांनी जैन धर्माला कसा राजाश्रय दिला, त्याकाळात जैन समाज कशा अवस्थेत होता, जैन कला, साहित्य इत्यादी विविध क्षेत्रात कशाप्रकारे मोलाची भर पडत गेली हे पुढील काळाच्या वर्णनात पहाणे आवश्यक ठरते.

**भारताचा प्राचीन इतिहास व जैन धर्म**

**प्रागैतिहास काळ ते महाभारत युध्द काळ-**

सुरुवातीच्या काळात प्रथम चौदा कुलंकर व मनु यांनी देशकाळानुसार समकालीन मनुष्याचे नेतृत्व व मार्गदर्शन केले. त्यातील अंतीम कुलकर नाभिराज असत त्यांचेच पुत्र प्रथम तीर्थंकर ऋषभनाथ झाले. नाभिसुत ऋषभदेवांनी पाषाणकालीन प्रकृत्याश्रित असभ्य युगाचा अंत करुन ज्ञान-विज्ञान संयुक्त कर्मप्रधान मानवीसंस्कृतीचा भूतलावर सर्वप्रथम ओम नमः केला. अयोध्येपासून हस्तिनापूरपर्यंतचा प्रदेश या नविन संस्कृतीचे प्रमुख होते. त्यांनी असि, मसि, कृषि, शिल्प, वाणिज्य व विद्यारुप षट्कर्मांचा तसेच केवलज्ञ ाानानंतर देवपूजा, गुरुभक्ती, स्वाध्याय, संयम, तप व दान या धार्मिक षट्कर्माचा मानवाला उपदेश केला.राज्यव्यवस्था, समाजसंघटन करुन, नागरी सभ्यतेच्या विकासाचे बीजारोपण केले. कर्माश्रयानुसार क्षत्रिय, वैश्य, शूद्र विभाजन केले. त्यांच्यापासूनच भारतीय क्षत्रियांच्या प्राचीन इक्ष्वांकू वंशाची सुरुवात झाली. लोकांना लौकिक व पारलौकिक उपदेश देऊन त्यांनी निःस्पृह योगमार्ग स्विकारला. त्यांचा पुत्र भरत याने आपल्या पराक्रमाने संपूर्ण भारताला एक राजनैतिक सूत्रात बांधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावरुन या देशाला भारतवर्ष नामाभिधान देण्यात आले. ऋषभांच्या एका पुत्राचे नांव द्रविड होते, ज्याला उत्तरकालीन द्रविडांचा पूर्वज मानले आहे. विद्याधर कन्येबरोबर विवाह करुन हे विद्याधरांचे नेते बनले, त्यामुळेच कालांतराने त्यांना द्रविड म्हणून ओळखण्यात येऊ लागले. भारताचा पुत्र अर्ककीर्तिपासून सूर्यवंश, बाहूबलीचा पुत्र सोमयशापासून चंद्रवंश व जयकुमार पासून कुरुवंश सुरु झाला असेही मानण्यात येते. ऋषभदेवाव्दारे उपदेशिलेला हा अहिंसामयी सरळ आत्मधर्म त्या काळात संभवतः ऋषभधर्म, आर्हत्धर्म, मुक्तिसुखाचा मार्ग म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांनी अनुप्रणित केलेली संस्कृति म्हणून ओळखली जाऊ लागली. ऋषभनाथानंतर झालेल्या अजितनाथ व विभिन्न तीर्थंकारांनी या संस्कृतीचे पोषण केले व सदाचार प्रधान योगधर्माचा पुनःप्रचार केला.

**सिंधु संस्कृति व सभ्यता -** ज्या काळात मध्यप्रदेशात उपर्युक्त श्रमण संस्कृती हलके हलके विकसित होत होती, त्याच काळात ऋषभधर्म किंवा श्रमण संस्कृतीने प्रभावित विद्याधरांची लौकिकता व भौतिकता प्रधान उत्कृष्ट नागरी सभ्यता एकीकडे नर्मदा नदीच्या काठी व दुसरीकडे सिंधु नदीच्या काठी पल्लवित होत होती. वर्तमान शतकाच्या सुरुवातीला भारतीय पुरातत्व विभागाने सिंधु प्रांतातील लरकाना जिल्ह्यात व पश्चिम पंजाबच्या मानगुजरी जिल्ह्यात महत्वपूर्ण उत्खनन करुन प्राचीन काळातील एक प्रगत व अत्युकृष्ट संस्कृती जगाच्या निदर्शनास आणली. उत्खननात विस्तृत शहरे, रस्ते, प्रचंड इमारती, वस्त्रे, आभूषणे, सभाभवने, मूर्ती प्रतिमा, हत्यारे इत्यादी विविध पुरतत्वीय वस्तु व वास्तू उपलब्ध झाल्या असून या संस्कृतीचे प्राचीन अस्तित्व सिध्द करण्याला ही ऐतिहासिक सामग्री अतिशय उपयुक्त आहे. उपलब्ध वस्तूंच्या आधारे या संस्कृतीचे वेगवेगळेपण, प्रगमनशीलता इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण होती असे निश्चितपणे आढळते, प्रमाणबध्द नगररचना, प्रचंड इमारती व वस्त्रांचा उपयोग हे तत्कालीन इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षा सिंधु संस्कृतीच्या प्रगतीचे लक्षण आहे. विव्दानांच्या मते या संस्कृतीचा काळ इ.स. पू ६००० ते २५०० पर्यंत मानला जातो.

यावरुन प्रतीत होते की, तिसरे तीर्थंकर संभवनाथांच्या काळात सर्वप्रथम या प्राचीन सभ्यतेचा प्रारंभ झाला. संभवनाथांचे विशिष्ट लांछन अश्व आहे व सिंधु नदीच्या आसपासचा प्रदेश अश्वासाठी प्रसिध्द आहे. ही संस्कृती अवैदिक, अनार्य नव्हती तर प्राग्वैदिक होती. या संस्कृतीचा पुरस्कर्ता ऋग्वेद प्रणीत योगधर्माचे अनुयायी व श्रमण संस्कृतीचे उपासक, प्राचीन विद्याधर अर्थात द्रविड जातीचे पूर्वज असावेत असाही एक अंदाज देण्यात येतो. सर जॉन मार्शलचे मत आहे की, "सिंधु संस्कृति व वैदिक संस्कृती यांच्या तुलनेने ही गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट होते की, या दोन्ही संस्कृतीमध्ये परस्पर कोणताही संबंध नाही. वैदिकधर्म सामान्यत: मूर्तिपूजक नाही तर मोहोंजोदारो व हरप्पा येथे मूर्तिपूजा सर्वत्र असलेली दिसते. मोहोंजादारोच्या घरांमध्ये हवनकुंडांचा अभाव आहे" सिंधु संस्कृतीच्या अवशेषामध्ये नग्नपुरुषांच्या आकृत्या अंकित असलेल्या अनेक मुद्रा मिहाल्या आहेत, या मूर्तिवरुन सिध्द होते की, या संस्कृतीतील लोक केवळ-योगीयासाचा अभ्यासच करीत नव्हते तर योग्यांच्या मूर्तीची पूजाही करीत असत. मुद्र किंवा शिक्यावर असलेली योगीदेवता कायोत्सर्ग मुद्रवस्थेत दाखविलेली आहे. हे कायोत्सर्ग ध्यान विशिष्टतया जैन आहे. पुराणात या कायोत्सर्ग मुद्रेचा उल्लेख ऋषभनाथांच्या तपश्चरणाच्या संबंधात अनेकदा आलेला आहे. जैन ऋषभाच्या कायोत्सर्ग मुद्रवस्थेतील प्राचीन मूर्ति इसवी सन प्रारंभापासून अनेक आढळतात. ऋषभ शब्दाचा अर्थ 'बैल' व वृषभ हे जैन ऋषभनाथांचे लांछन आहे. प्रत्यक्षात सिंधु संस्कृतीत अनेक मुद्रा वृषभयुक्त कायोत्सर्ग योगियांची मूर्ति अंकित असलेल्या मिळाल्या आहेत. प्रा. प्राणनाथ विद्यालंकार सिंधु संस्कृतीतील धर्मालाच केवळ जैन धर्म मानीत नाहीत तर तेथे मिळालेल्या एका मुद्रेवर (नं ४४९) त्यांनी 'जिनेश्वर' (जिन इसरह) शब्द असल्याचेहि सांगितले आहे. सातवे तीर्थंकर सुपार्श्वनाथाचे लांछन स्वस्तिक आहे व सिंधु संस्कृतीतील लोकांमध्ये स्वस्तिक हे चिन्ह अतिशय लोकप्रिय असलेले दिसते. सडकेवर, गल्लीमधूनही स्वस्तिकाकार मिळतात. डॉ. हेरास यांच्या मते "मोहेंजोदारोचे प्राचीन नाव 'नंदूर' अर्थात मकरदेश होते. नंदूर लिपी ही सर्वप्रथम लिपी असून, ही संस्कृती भूतलावरील सर्वप्रथम सभ्यता होय. याबाबतीत लक्षात घेण्याजोगी गोष्ट ही की मकर नववे तीर्थंकर पुष्पदंताचे लांछन होते. प्रो. एस. श्रीकंठशास्त्रींच्यामते, " दिगंबर धर्म, योग मार्ग, वृषभ इत्यादी विविध लांछनाची पूजा इत्यादी कारणामुळे प्राचीन भारतीय सिंधु-संस्कृती जैन धर्माशी अद्‌भूत सादृश्य दिसते. मूलतः ती संस्कृती अनार्य, अवैदिक आहे हे निश्चित होय."

या प्राचीन सिंधु संस्कृतीचे पुरस्कर्ते प्राचीन विद्याधर जातीचे लोक होते. ज्यांना द्रविडांचे पूर्वज म्हटले जाते. तथापि त्यांचे प्रेरक किंवा धार्मिक मार्गदर्शन मध्यप्रदेशातील मानववंशी मूळ आर्य जे तीर्थकाराचे आत्मधर्म व श्रमण संस्कतीचे उपासक होते, ते असावेत. तिसरे तीर्थंकर संभवनाथापासून ते नववे तीर्थकार पुष्पदंतापर्यतचा काळ संस्कृतीच्या विकासाचा व उत्कर्षाचा काळ आहे. हरप्पा संस्कृतीही अनार्य व अवैदिकच होती. तथापि कालांतरानी वैदिक संस्कृतीला जन्म देणा-या पश्चिमी आर्याचा या संस्कृतीशी संबंध व संघर्ष आला असणे शक्य आहे. इ.स.पू २३५०च्या सुमारास हरप्पा संस्कृतीचा पश्चिम आशियाई सुमेर

संस्कृतीबरोबर संपर्क निश्चितपणे आला होता असे दिसते. हरप्पोतर झुंकर संस्कृती किंवा सभ्यता मानली जाते व त्यानंतर वैदिक संस्कृतीचा आरंभ होतो.

सामान्यत: इ.स.पू. २००० ते १००० हा काळ वैदिक संस्कृतीचा विकास काळ परमोत्कर्ष काळ मानला जातो. ऋग्वेदात आर्यांच्या तत्कालीन सर्वांगीण जीवनाचे विश्लेषण केले आहे. त्याचप्रमाणे प्राचीन भारतीय स्थितीचे वर्णन करताना योगीश्वर ऋषभनाथांचे उल्लेख आढळतात. जैन अनुश्रुतीनुसार दहावे तीर्थकार शीतलनाथांच्या नंतर बाम्ह्यणांनी श्रमण परंपरेशी आपला संबंध विच्छेद करुन आपली पृथक संस्कृती व सभ्यता प्रस्थापित केली. ब्राम्हण वर्गाला समाजात असलेले उच्चस्थान पाहून मध्यदेशीय ब्राम्हण त्यांच्याकडे आकृष्ट झाले असावेत.

पुढील काळात वैदिक व मूळ निवासी यांच्यात सलोख्याचे संबंध प्रस्थापित होण्यास सुरुवात झाली व त्यांच्यात रक्तमिश्रणही होऊ लागले. पंजाबपासून ते उत्तर प्रदेशापर्यंत त्यांनी आपल्या संस्कृतीची केंद्रस्थाने प्रस्थापित केली. त्यामुळेच पूर्वीचे मध्यप्रदेशातील श्रमणोपासक मानव, मगध, दक्षिणभारत इ. प्रदेशात स्थिर होऊ लागले. बावीसावे तीर्थंकार मुनिसुव्रतच्या काळापर्यंत दोन्हीही संस्कृतींची उत्तरोत्तर मोठ्या प्रमाणात वाढच झाली. या काळात अयोध्यापती इक्ष्वाकूच्या सूर्यवंशात उत्पन्न झालेल्या श्रीरामचंद्राव्दारे दोन्ही संस्कृतीच्या समन्वयाचे भगीरथ प्रयत्न केले गेले. श्रीराम श्रमणपरंपरेत एक महान पुराणपुरुष व त्याचभवातून मोक्ष प्राप्त करणारे सिध्दपरमात्मा झाले. तर वैदिकानी त्याला ईश्वरी अवतार मानले. एकीकडे त्यांना परम अहिंसक आत्मोपासक मानले, तर दुसरीकडे ते यज्ञ व याज्ञिक यांचे रक्षक बनले. हा समन्वयात्मक उत्तरेकडील विचार दक्षित भारतात पसरविण्यात आला व आर्य द्रविड संबंध पुनरुजिवित झाले.

ज्याप्रमाणे अयोध्येच्या रामाच्या स्वरुपाच्या संस्कृती समन्वयाचा प्रयत्न केला गेला, तोच प्रयत्न यदुवंशी कृष्णाच्या रुपाने करण्यात आला. हे दोन्ही पुरुष भारताच्या मौलिक सांस्कृतिक एकतेचे प्रतीक होत. कृष्ण या दोन्हीही परंपरामध्ये समान रुपाने सन्माननीय मानलेला आहे. ब्राम्हण संस्कृतीमध्ये कृष्णाच्या अवताराच्या स्वरुपात पुजिले जाते तर, श्रमण किंवा जैन परंपरेनुसार त्यांना नारायण, अर्धचक्री, त्रिखंडी, श्रावकोत्तम, आपल्या कालातील सर्व प्रतापी सर्व शक्तिमान आदर्श राजा व धर्मात्मा भावी तीर्थंकर म्हणून पूज्य मानलेले आहे. स्वत: पांडव बंधू ही जैनधर्माचे उपासक होते व शेवटी जैन मुनी प्रमाणे त्यांनी तप केले असे सांगितले जाते.

वेदांचे स्वयिता ऋषिगण व ब्राह्यण परंपरेतील अन्य ऐतिहासिक पुरुष जितके वास्तविक मानले जातात तितक्याच प्रमाणात जैनांचे तीर्थंकर वास्तविक ऐतिहासिक पुरुष होत. जैन पुराणात तत्कालासंबंधी केलेले चित्रण अधिक बुध्दिगम्य, युक्तियुक्त व वास्तवतेच्या जवळचे आहे. श्रमणसंस्कृतीही शुध्द भारतीय संस्कृती असून ती वैदिक धर्म किंवा ब्राह्यण परंपरेच्या अगोदर अस्तित्वात होती, विकसीत होती. वैदिक संस्कृतीच्या उदय विकासानंतर या दोन्हीमध्ये संघर्ष, समन्वय, सांस्कृतिक आदान प्रदान झाले. प्रत्येक संस्कृती आपले स्वत:चे अस्तित्व कायम ठेवून विकसीत होत गेली.

**महाभारत काळ ते भगवान महावीर**

( इ.स.पू. १४०० ते इ.स.पू. ६००)

प्राचीन भारताचा ऐतिहासिक कालखंड सामान्यत: इ.स.पू. ६व्या शतकापासून म्हणजेच बौध्द व जैन धर्माचा प्रसार, तसेच मगध-साम्राज्याच्या उदयापासून मानण्यात येतो. त्या अगोदरच्या काळास प्रागैतिहासिक काळ असे म्हणतात. महाभारत काळासंबंधी विव्दानात अनेक मतभिन्नता असली तरी सामान्यत: इ.स.पू.१४०० हा काळ विव्दत्मान्य आहे. ब्राह्यण परंपरेनुसार या काळातच व्दापारयुगाचा अंत झाला व कलियुगाची सुरुवात झाली. असे मानण्यात येते. इ.स.पू. १४ ते इ.स.पू ६ हा काळ उत्तर वैदिककाळ समजला जातो व हाच काळ श्रमण संस्कृतीच्या पुनरुध्दाराचा काळ होय. महाभारतोत्तर काळात उत्तर भारतात वैदिक क्षत्रियांची १२ राज्ये

होती. वत्स, कुरु, पांचाल, शूरसेन, कोसल, काशी, पूर्व विदेह, मगध, कलिंग, अवंती, माहिष्पती व अश्मक, त्यापैकी कुरु, पांचाल, कोसल विदेह व काशी ही पाच राज्ये प्रमुख होती. याशिवाय पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण दिशांना जी राज्ये होती ती प्राय: श्रमणोपासक क्षत्रियांची होती. याच काळाच्या सुमाराला विदेह येथे बलवान संघराज्याची स्थापना झाली शेजारचेच वैशालीचे लिच्छवी संघराज्य यात मिसळले व वृज्जी नावाच्या मोठ्या संघराज्याची स्थापना झाली. संघराज्यातील लोक श्रमणोपासक व्रात्य क्षत्रिय होते. याच सुमाराला दक्षिणेत तेरापूर नांवाच्या ठिकाणी करकंडु नावाचा एक प्रतापी जैन राजा झाला. ज्यांच्या ऐतिहासिकतेबद्दल विव्दानात दुमत नाही. श्रवणधर्म पुनरुत्थानाचे सर्वप्रथम पुरस्कर्ते बावीसावे तीर्थंकर नेमिनाथ किंवा अरिष्टनेमि होते. हे वासुदेव कृष्ण यांचे बंधू होत. कृष्णनी प्रवृत्तीचा मार्ग स्वीकारला तर नेमिनाथानी निवृत्तीचा चिरकाल अहिंसाधर्माचा प्रचार केल्यानंतर काठेवाडच्या गिरनार पर्वतावर नेमिनाथांनी निर्वाण प्राप्त केले. तीर्थंकर नेमिनाथांचा विशेष प्रभाव पश्चिम व दक्षिण भारतावर झाला. दक्षिण भारतात मिळालेल्या जैन तीर्थंकराच्या प्रतिमा नेमिनाथांच्याच प्रतिकृती आहेत. नेमिनाथांच्या ऐतिहासिकतेबद्दल सुरुवातीला साशंकता व्यक्त केली जात होती. तथापि डॉ. नगेद्रनाथ वसु, डॉ. फुहरर, प्रा. बारनेट, कर्नल राड, मि. कर्वा, डॉ. भट्टाचार्य, डॉ. प्राणनाथ विद्यालंकार, डॉ. राधाकृष्णन इत्यादी विव्दानांच्या मते तीर्थकर नेमिनाथ हे निश्चितपणे ऐतिहासिक होत हे मान्य झाले आहे. नेमिनाथांच्या नंतर श्रमण पुनरुत्थान आंदोजनाचे दुसरे महान नेता तीर्थंकर पार्श्वनाथ होत. तिसाव्या वर्षी गृहत्याग करुन त्यांनी काही काळ दुर्ध्दर तपश्चरण करुन केवलज्ञान-अर्हतपदाची प्राप्ती केली. त्यानंतरचे आयुष्य त्यांनी विहार करुन धर्मप्रचारात खर्च केले व वयाच्या शंभराव्या वर्षी बिहार प्रदेशात सम्मेदशिखर पर्वतावर निर्वाणपद प्राप्त केले. आजही तो पर्वत पारसनाथ पर्वत म्हणून ओळखला जातो. करकंडु चरित्राचे नायक कलिंगचा शक्तिशाली राजा करकंडु हाही ऐतिहासिक व्सक्ती असून पार्श्वनाथांचा उपासक व आदर्श राजा होता. राज्य कारभाराचा त्याग करुन मुनीच्या रुपानी त्याने तपस्या केली व सद्‌गति प्राप्त केली असे सांगितले जाते. तेरापूर येथील गुफातील मिळालेल्या पुरातात्विक चिन्हानुसार तत्संबंधी जैन अनुश्रुति प्रमाणित होतात. याशिवाय पांचाल राजा दुर्मुख, विदर्भ राजा भीम, गंगाधर राजा नागजित हे पार्श्वनाथ तिर्थंकराचे अनुयायी व तत्कालीन राजे होते.

महाभारत्तोतर श्रमण पुनरुध्दार आंदोलनाचे सर्व प्रमुख नेते म्हणजे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर होत. गौतम बुध्द व त्यांनी स्थापन केलेला बुध्दधर्म या काळातीलच होय. भगवान महावीरांचे वैशिष्ट्य हे की त्यांनी सामान्य मनुष्याच्या स्वरुपात जन्म घेतला. बाल्यावस्था व कुमारावस्िा त्याच स्वरुपात घालविली. स्वपुरुषार्थाच्या आधारे त्यांनी आत्मान्नति केली. तिर्थंकर प्रणित मार्गाचा त्यांनी आपल्या जीवनात शुध्द व श्रेष्ठ रुपानी अवलंब केला व लोककल्याणार्थ त्याचा उपयोग केला. केवळ जैन धर्माच्या इतिहासातच त्यांचे स्थान वैशिष्ठ्यपूर्ण नव्हे तर भारताच्या, विश्वाच्या धार्मिक इतिहासात त्यांना महत्वपूर्ण स्थान आहे. भगवान महावीरांनी कोणत्याही नवीन धर्माचा प्रचार केला नाही किंवा नवीन धार्मिक मार्ग आपण दाखवित असल्याचा दावा त्यांनी केला नाही. त्यांनी कोणत्याही देवदेवतेचा किंवा दैविक शक्तिचा आधार घेतला नाही किंवा कोणत्याही राजा महाराजाचे सहकार्य मिळावे अशी अपेक्षा दाखविली नाही.

चैत्र शुध्द १३ (३० मार्च इ.स.पू. ५९९) या दिवशी प्राचीन भारतातील व्रात्य क्षत्रियांच्या वृज्जिसंघ नांवाच्या गणराज्यात असलेल्या कुंडग्राम येथील ज्ञातृक वंशी, काश्यप गोत्री क्षत्रिय नेता सिध्दार्थ राजाची पत्नी त्रिशला देवीनी वर्धमान माहावीराला जन्म दिला. कुंडग्राम वृज्जिसंघराज्याची राजधानी वैशाली जवळ होते. या संघाचा प्रमुख वैशालीचा राजा चेटक माहवीराचे आजोबा होते. त्यामुळे पितृकुलाकडून महावीरांना इ ाातृक पुत्र नातपुत्र व काश्यप व मातृकुलामुळे लिच्छाविक व वैशालिय म्हणतात. वीर, अतिवीर, महावीर, सन्मतिवीर, वर्धमान या विविध नांवानी महावीरांना संबोधलेले दिसते. महाराजा चेटकला दहा मुले व सात मुली होत्या. त्यांचा ज्येष्ठ पुत्र सिंहभद्र वृज्जिगणाचा प्रसिध्द सेनापती होता. त्यांच्या मुलींपैकी ज्येष्ठा व चंदना बालब्रम्हचारी असून महावीरांच्या उपदेशानी त्या आर्यिका बनल्या, महाराजा चेटकाचा सर्व परिवार महावीरांचा भक्त होता.

महावीरांचे चित्त सुरुवातीपासून संसार देहभोगापासून विरक्त असून, लोककल्याण करण्याची त्याची उत्कट भावना होती. त्यामुळेच विवाहाला नकार देऊन वयाच्या विसाव्या वर्षी त्यांनी गृहत्याग केला. बारा वर्ष

त्यांनी दुर्ध्दर तपश्चरण करुन आत्म्याला सर्व प्रकारच्या कर्मापासून शुध्द व पवित्र बनविले. वयाच्या ४२ व्या वर्षी त्यांना केवलज्ञान प्राप्त झाले. विपुलाचल पर्वतावर त्यांचे पहिले समवसरण झाले. त्यांनी आपला प्रथम उपदेश अर्धमागधी या लोकभाषेत केला. मगध सम्राट बिम्बसार श्रेणिक त्यांचा सर्वप्रथम श्रोता होता. इंद्रभूति-गौतम, अग्निभूति, वायुभूति, आर्यव्यक्त, सुधर्म-मंडिकपुत्र, मौर्यपुत्र, अकम्पित, अचल, मैत्रेय व कौडिण्य-गोत्री, प्रभास हे त्यांचे अकरा गणधर किंवा मुख्य शिष्य होते. महासती चेलना त्यांच्या आर्यिका संघाची अध्यक्षा व सम्राज्ञी चेलना श्राविका संघाची नेती होती. अशा प्रकारे मुनि, आर्यिका, श्रावक, श्राविका या चतुर्विध संघाच्या रुपात जनसमुदायाला कोणताही वर्ण, वर्ग, लिंग, जाती इत्यादी भेदभाव न करता माहवीरांनी आपला उपदेश दिला. पुढील तीस वर्षात देशातील निरनिराळ्या राज्य व राजधान्यांना त्यांनी भेटी दिल्या. महाराजा चेटक, चंपाचा राजा दधिवाहन, कलिंग राजा जितशत्रु, श्रावस्ती राजा प्रसेनजित, मथुरेचा राजा उदितोदय, हेमाङ्द राजा जीवंधर, पोदनपूरचा राजा विद्रदाज, पलाशपूरचा राजा विजयसेन, पांचाळपूरचा राजा जय इत्यादी अनेक सत्ताधीश भगवान महावीरांच्या उपदेशानी प्रभावित झाले. कित्येकांनी मुनि बनून आत्मसाधना केली. विपुल जैन साहित्य निर्माण केले अखेर कार्तिक कृष्ण अमावस्या (१५ आक्टोंबर इ.स.पू. ५२७) ला पावा येथील कमलसरोवरात मध्यभागी व्दिपाकार असलेल्या भूमीवर भगवान महावीरांना निर्वाण प्राप्ती झाली.

भ.महावीरांचे पाच लाख भक्त अनुयायी होते व ते त्यांनी स्थापिलेल्या चतुर्विध संघाचे सदस्य होते. मुनिसंघ अकरा गणधरांच्या नऊ गणामध्ये विभागलेला होता. श्रावक-श्राविकांमध्ये सर्व जातीचे स्त्री-पुरुष होते. भारतवर्षातील प्रत्येक भागात महावीरांचे अनुयायी होते. भारताबाहेरही गांधार, कपिशा इत्यादी देशात त्यांचे भक्त होते. भगवान महावीरानंतरच्या काळातही जैनधर्म दिवसेदिवस वृध्दिंगत होत गेला. पुढील काळात मौर्य, गुप्त, हर्षवर्धन, गुर्जर, प्रतिहार इत्यादी घराण्यांच्या कारकीर्दीत या धर्माची निरंतर वाढच झाली. दक्षिण भारतात तर जैनधर्म काही काळ प्रमुख धर्म बनला.

### मगध, मौर्य, शृंग व कण्व, कलिंग

आर्याच्या पूर्वेकडील प्रसारानंतर उत्तर हिंदुस्थानात १६ महाजनपदे निर्माण झाली. या महाजनपदांमध्ये साम्राज्यविस्तारार्थ सदैव संघर्ष होत असल्याची माहिती मिळते. या संघर्षात मगधच्या राज्याला यश आलेले दिसते. पुढील काळात या मगधच्या राज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले व या साम्राज्याने भारतीय इतिहासातील जवळजवळ एक हजार वर्षे आपले स्वतःचे एकमेव बलवान सत्तेचे अस्तित्व कायम टिकविलेले दिसून येते. मगध राज्याचे साम्राज्यात रुपांतर करण्याच्या कार्यात बिंबिसार, अजातशत्रु, उदयन, महापद्मनंद व धनानंद इत्यादी राजांचे कार्य असामान्य होते.

महावीरांच्या समकालीन राजपुरुषांमध्ये श्रेणिक किंवा बिंबिसार या राजाचे स्थान महत्वाचे आहे. हा मगधच्या प्रदेशाचा प्रमुख राजा असून आपल्या राज्याचा विस्तार करताना त्याने शेजारचे अंगचे राज्यही जिंकले होते. कोसल राजाच्या राज्यकन्येबरोबर याचा विवाह झालेला असून कोसलच्या राज्याकडून आंदण म्हणून काशीचे राज्य त्यास मिळाले होते. श्रेणिकाची दुसरी पत्नी चेलना ही वैशालीची राज्यकन्या असून, महावीरांची माता त्रिशला ही चेलनाराणीची थोरली बहिण होय. श्रेणिक राजाला महावीरांच्या उपदेशाकडे आकर्षित करण्यास राणी चेलना हीच प्राधान्याने कारणभूत होती. याशिवाय मद्र (सध्याचा मध्य पंजाब) प्रदेशाच्या राज्याची राजकन्या क्षेमा ही श्रेणिकाची आणखी एक पत्नी होती. समकालीन राजपुरुषांशी श्रेणिकाचे मैत्रीचे संबंध होते. एकदा उज्जयनीचा राजा प्रद्योत राजा आजारी पडला असताना श्रेणिकाने आपला वैद्य जीवक याला त्या राजाच्या उपचारार्थ पाठविल्याची माहिती मिळते. वृध्दापकाळात श्रेणिकाची स्थिती मात्र हलाखीची झाली. त्याचा पुत्र कुणिक किंवा अजातशत्रु याने श्रेणिकाला तुरुंगात टाकले व राज्य बळकाविले. तथापि मातेच्या शिकवणुकीमुळे अजातशत्रूला आपल्या कृत्याबद्दल पश्चाताप वाटू लागला व तो भाला घेऊन पित्याच्या हातातील बेड्या तोडण्यास निघाला. तथापि श्रेणिकाला वाटले की आपला खून करण्यासच आला आहे, म्हणून त्याने स्वतःच्या हातानेच मृत्यू स्वीकारला.

प्राधान्याने सर्व प्राचीन  जैन आगमग्रंथात महावीरांचा उपासक म्हणूनच श्रेणिक राजाचे वर्णन आले आहे. त्यानी अनेकदा महावीरांचा धर्मोपदेश ऐकल्याचीही माहिती मिळते. तसेच राजा श्रेणिकाचे पुत्र महावीरांच्या संघात साधु म्हणून समाविष्ट झालेले होते. दिगंबर संप्रदायातील बहुतेक पुराणात श्रेणिक राजाने प्रश्न विचाराला तेव्हा महावीरांनी हे पुराण सांगितले हे पुराण सांगितले अशीच सुरुवात केलेली आढळते. बौध्द वाङ्मयात श्रेणिक गौतमबुध्दाचा उपासक असल्याची वर्णने आढळतात. तथापि अनेक जैन कथामध्ये श्रेणिक सुरुवातीला बौध्दधर्मीय होता. राणी चेलनेच्या प्रयत्नामुळे तो जैनधर्माकडे वळाला असे वर्णन आढळते. यावरुन श्रेणिक निश्चितपणे नंतरच्या काळात महावीरांचा उपासक होता असे सांगता येते. श्रेणिकाप्रमाणेच तात्कालीन आणखी काही प्रमुख राजपुरुषांचा महावीराबरोबर संबंध असल्याची माहिती मिळते. वत्स (गंगा व यमुना यांच्या दुआबातील प्रदेश) देशाची राजधानी कौशांबी येथील राजा शतानिक याची पत्नी मगावती, दशार्ण (चंबळ नदीच्या परिसरातील प्रदेश) देशाच्या हेरकच्छ नगराचा राजा दशरथ याची पत्नी व कच्छ देशाचा रोरुक नगराचा राजा उदयन याची पत्नी प्रभावती या तिघीही चेटक राजाच्या कन्या म्हणजेच महावीरांची माता त्रिशला हिच्या बहिणी होत्या. याशिवाय कलिंग( ओरिसा) देशाचा राजा जितशत्रु यांची पत्नी अनुदरी ही महावीरांचे पिता सिध्दार्थ याची बहीण होती. या सर्वाच्या संबंधामुळे महावीरांचे धर्मप्रसार कार्य अधिक सुलभ व प्रभावित झाले. या राण्या, राजे इत्यादींनी महावीरांच्या तत्वज्ञानाचा स्विकार केला. त्यामुळे समाजात या विचारांचा प्रभाव निर्माण झाला. उपर्युक्त प्रमुख प्रदेशाशिवाय कुरु व पांचाल(पश्चिम तीरावरील प्रदेश) या तत्कालीन राज्यामध्ये गणराज्य शासनपध्दती अस्तित्वात होती. या गणराजयाच्या प्रमुखांनीही महावीरांची धर्मवचने ऐकल्याची वर्णने  आढळतात.

बिंबिसार किंवा श्रेणिक राजानंतर त्याचा पुत्र कुणिक किंवा अजातशत्रु हा मगध प्रदेशाचा राजा झ ाला. कुणिक आपल्या पित्याच्या मृत्यूला कारणीभूत झाला. तथापि नंतरच्या काळात त्याला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला. त्यांने आपल्या पित्याचे राजकीय व धार्मिक धोरण त्याच पध्दतीने पुढे चालविले. मगधच्या राज्यात अंग व काशी प्रदेशाचा समावेश होत होताच. कुणिकने गंगेच्या उत्तरेला स्वा-या करुन विदेह (उत्तर बिहार प्रदेश) प्रांतही जिंकला. या प्रदेशातील मल्ल, लिक्ष्छवी, काशी, कोसल इत्यादी छत्तीस गणराज्यांनी अजातशत्रुच्या प्रतिकारार्थ संघ स्थापन केला. चेटक राजा हा या संघाचा प्रमुख होता. तथापि सुमारे वीस वर्ष चाललेल्या युध्दात शेवटी अजातशत्रुला यश मिळाले. या विजयामुळे मगध साम्राज्याचा ख-या अर्थाने पाया घालण्यात आला. या युध्दाच्या वेळी सैन्याला योग्य प्रकारे संचलन करता यावे म्हणूनच गंगा व शोणभद्र यांच्या संगमाजवळ अजातशत्रुने पाटलीपुत्र नांवाचे नवीन शहर बसविण्यास आरंभ केला.

अंग प्रदेशाचे प्रमुख शहर चंपापुर हे अजातशत्रुचे आवडते निवासस्थान होते. महावीरांचे पाचवे गणधर सुधर्मस्वामी यांचा धर्मोपदेश येथे अजातशत्रूनी कित्येकदा ऐकला. बारा अंग स्वरुपात महावीरांच्या उपदेशाचे संकलन करण्याचा प्रारंभ याच वेळी झाला असावा. उपलब्ध अंग ग्रंथाच्या प्रारंभी बहुधा वर्णन आहे की, सुधर्मस्वामी चंपानगरीत विहार करीत असता. जंबूस्वामींनी  त्यांना प्रश्न विचारला. तेव्हा त्यांनी प्रस्तूत विषयाचे निरुपण केले आहे.

तीर्थंकराच्या उपदेशाचे संकलन त्यांचे प्रमुख शिष्य गणधर करीत असत. भगवान महावीरांच्या संघामध्ये हे कार्य करणारे अकरा गणधर होते. त्यातील पहिले गौतम इंद्रभूति व पाचवे सुधर्मस्वामी हे या संघातील प्रसिध्द गणधर होत. या गणधरांनी महावीरांच्या उपदेशाच्या केलेल्या संकलनाला ‘अंग’ म्हणतात.गणधरांनी संकलित केलेले वाङ्मय म्हणून या ग्रंथाना ‘व्दादशांग गणिपिटक’ असे म्हणतात.गणधरांनी संकलीत केलेले हे ग्रंथ सुमारे एक हाजर वर्षापर्यंत केवळ आचार्यांच्या उपदेशांच्याच परंपरेने अस्तित्वात राहिले. लिखित स्वरुपात त्यांची नोंद झाली नाही म्हणूनच काळाच्या ओघात त्यांच्या मूळ स्वरुपातही बराच फरक पडला. दीर्घकालीन दुष्काळासारख्या आपत्तीच्यावेळी साधुसंघाची संख्या कमी होत गेली. अशा वेळी या ग्रंथातील उपदेश लुप्त होऊ नये म्हणून साधु संमेलने भरवून त्यांचे स्वरुप निश्चित करण्यात आले. इतिहास काळात अशा प्रकारची तीन संमेलने भराल्याची माहिती मिळते. या संमेलनातून निश्चित केलेल्या पाठांना ‘वाचना’ असे नांव देण्यात येते. पाटलीपुत्र, मथुरा व वल्लभी येथे झालेल्या तीन

वाचनामध्ये या ग्रंथाचे स्वरुप निश्चित करण्यात आले. तथापि या निरनिराळ्या वाचनामधून निश्चित झालेले पाठ दिगंबर संप्रदायाला मान्य नाहीत. या बारा अंग ग्रंथाचे वर्णन याच ग्रंथातील जैन भाषा व साहित्य या विभागात दिलेले आहे.

राजा कणिकनंतर त्याचा पुत्र उदयन किंवा उदायी हा मगधचा राजा झाला. त्याने पाटलीपुत्र ही राजधानी केली व पित्याप्रमाणे उत्कृष्ट प्रकारे राज्यकारभार करण्यास सुरुवात केली. उदयन हा निष्ठावान जैन उपासक होता. अष्टमी व चतुर्दशी या तिथिंना तो उपवास करून धर्मोपदेश ऐकत असे. अशा प्रकारे एका वेळी उपदेश ण्केत असतानाच एका अज्ञात व्यक्तीनी त्याचा खून केला. उदयन राजाचा प्रतिस्पर्धी उज्जयनीचा राजा पालक यानी या खुनी इसमाला पाठविले असावे अशी कथा ग्रंथामधून आढळते.

राजा उदयनंतर मगधचा इतिहास बराचसा अस्पष्ट आहे. या वंशानंतर नजीकच्या काळात कोणताही प्रभावी राजा मगधच्या सत्तेवर आलेला दिसत नाही. महावीरांच्या निर्वाणानंतर १०० वर्षानी नंद घराण्याची सत्ता प्रस्थापित

झाली.

महापद्मनंद हा मगधावर प्रस्थापित झालेला नंद घराण्याचा संस्थापक होय. महापद्मनंद नीच कुळात जन्मलेला असला तरी अतिशय पराक्रमी होता. त्याच्या कारकीर्दीत उत्तर भारतात असलेल्या अनेक क्षत्रिय राजाना त्याने ठार केले. क्षत्रांतकारी, महाक्षत्रांतकारी इत्यादी पदव्या त्याला लावलेल्या होत्या. कोसल,मथुरा,अवंती इत्यादी प्रदेश जिंकून त्यानी ते प्रदेश मगध साम्राज्यात समाविष्ठ केले. त्यांच्या भांडारात अगणित संपत्ती असल्याची माहिती मिळते. नंदराजाचे प्रधानपद जैन उपासकांकडेच होते. त्यांच्या कल्पक व त्यांचे वंशज यांनी नंद घराण्याची सर्वांगीण प्रगति करण्यात व राजकीय धोरण ठरविण्याच्या बाबतीत महत्वाचे कार्य केले. या घराण्याचा अंतिम राजा धनानंद असून, धनानंदाचा मंत्री शकटाल हा होता. आचार्य स्थूलभद्र हे शकटालचेच पुत्र होत.या नंद घराण्याच्या जैन धर्माशी नुसता त्यांच्या मंत्र्याच्या बाबतीतीलच संबंध होता असे नव्हे तर, महाराजा खारवेलच्या हाथीगुंफा येथील शिलालेखात नंद राजानी कलिंगवर आक्रमण करुन तेथील जैनमूर्ति मगधला नेल्या होत्या अशी माहिती मिळते. यावरुन नंद राजे जैनधर्माचे उपासक असावेत किंवा त्यांचा या धर्माकडे पाहण्याचा दृष्टीकोन परधर्मसहिष्णुतेचा असावा असे दिसते.

नंद घराण्याच्या कारकीर्दीच्या शेवटी असलेला धनानंद राजा हा अतिशय लोभी असल्याने त्याने जबरदस्त कर बसविण्याचा प्रसत्न केला. या जबरदस्त करामुळे प्रजा कंटाळून गेली होती. या धनानंदाच्या तावडीतून सर्वसामान्य प्रजेची सुटका करुन मगधावर एका बलवान राजवंशाची स्थापना करण्याचे कार्य चंद्रगुप्त मौर्याने केले. मगधावर मौर्य घराण्याच्या स्थापनेपासून भारतीय इतिहासाला वेगळीच कलाटणी मिळालेली दिसते. मौर्याचे साम्राज्य हे प्राचीन भारतीय इतिहासातील पहिले साम्राज्य होय.

जैन इतिहास साधनांच्या मते चंद्रगुप्त मौर्य हा क्षत्रिय कुळातील होता. तराई प्रदेशात पिप्पलीवन येथे मोरियांचे गणराज्य होते. हे लोक व्रात्य क्षत्रिय होते. स्वतः भ. महावीरांचे एक गणधर मोरियपुत या जातीचे होते व या जातीमध्ये जैनधर्माची प्रवृत्ती होती. मुनि, क्षुल्लक इत्यादी विशेष करुन दिगंबर परंपरेतील मयूरपिच्छधारी साधु या प्रदेशात मोठ्या प्रमाणात होते. मोरियवंशातील एका प्रमुखाच्या गावी चंद्रगुप्ताचा जन्म झाला असे जैन परंपरेनुसार समजले जाते. चाणक्य जयाने आपल्या अपमानाच्या बदल्यात नंद घरण्याचा विनाश करण्याची प्रतिज्ञा घेतली होती. चंद्रगुप्त आपल्या लहान सवंगड्यासमवेत राजदरबारी खेळ खेळत असताना चाणक्याच्या नजरेला पडला. चाणक्यानी बालकाची तरतरीत बुध्दी, वीरता, साहस वगैरे पाहून त्याला राजकीय लष्करी इ. विविध विषयांचे शिक्षण देण्याचे ठरविले. याचवेळी अलेक्झांडर भारतावर आक्रमण करुन आलेला होता. चंद्रगुप्ताला घेऊन चाणक्य पंजाबात गेला व त्याला ग्रीक सैनिक पध्दति, सैन्यसंचलन, इत्यादी ज्ञान मिळविण्यास सांगितले. चंद्रगुप्त मौर्यानी आपल्या असामान्य नेतृत्वाच्या व सैनिकी शक्तीच्या आधारावर अलेक्झांडरनी भारतात मिळविलेल्या प्रदेशाचे सात विभाग करुन त्यावर ज्या ग्रीक अधिका-यांची

नेमणूक केलेली होती, त्या सर्व अधिका-यांचा पराभव करुन तो प्रदेश आपलया ताब्यात घेतला. त्यामुळे गंगायमुना नदीपर्यंत पश्चिमेकडील प्रदेश चंद्रगुप्ताच्या ताब्यात आला. आपल्या सर्व सैन्याच्या व मिळविलेल्या प्रदेशाच्या आधारावर त्याने पाटलीपुत्रावर आक्रमण केले. यावेळी नंद, धनानंद व चंद्रगुप्त यांच्यात घनघोर युध्द झाले. शेवटी युध्दात नंद राजाचा पराभव होऊन, चंद्रगुप्ताची नंद राजाला पत्नी, मुले, मुली व एक रथ भरुन धन घेऊन जाण्यास परवानगी दिली. मगधावरील विजयामुळे पूर्वेकडून गंगायमुना नद्यांपर्यतचा प्रदेश त्याच्या ताब्यात आला व उत्तर हिंदुस्थानात त्याची एकमेव सत्ता प्रस्थापित झाली.

अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर सेल्युकस निकेटर हा सेनापती अलेक्झांडरने आशियात जिंकलेल्या प्रदेशाचा प्रमुख झाला. चंद्रगुप्ताने भारतातील ग्रीकाकडून घेतलेला प्रदेश परत मिळवण्यासाठी तसेच भारतात आणखी प्रदेश जिंकण्याच्या अपेक्षेने त्याने भारतावर आक्रमण केले. तथापि अलेक्झांडरप्रमाणे याला सुयश आले नाही, कारण सेल्युकस निकेटरला चंद्रगुप्त मौर्यासारख्या बलवान राजाबरोबर संघर्ष करणे भाग पडले. यावेळी या दोघामध्ये कशा प्रकारे युध्द झाले याची ग्रीक इतिहासकारांनी माहिती दिलेली नसली, तरी सेल्युकस निकेटरने काबूल, कंदाहार, अफगाणिस्थान, हिरात व मैरट हे पाच प्रांत यावेळी चंद्रगुप्तला दिल्याची माहिती मिळते. यावरुन या युध्दात चंद्रगुप्ताने निश्चितपणे सेल्युकस निकेटरचा पराभव केलेला असावा असे दिसते. यावेळी सेल्युकस निकेटरनी आपली हेलेमा नावाची मुलगी चंद्रगुप्ताला दिली व पुढील काळात दर पाच वर्षानी आपला राजदूत चंद्रगुप्ताच्या दरबारी पाठविला. डॉ. स्मिथच्या मते, “ग्रीक सैन्य ज्यावेळी शिस्तबध्द व योग्य नेतृत्व असलेल्या भारतीय सैन्याबरोबर युध्द करते त्यावेळी या युध्दात ग्रीकाच्या कमकुवतेचे व भारतीयांच्या असामान्य पराक्रमाचे प्रदर्शन होते.” प्रकारे परकीय आक्रमणापासून भारतीय प्रदेशाचे व संस्कृतीचे संरक्षण करण्याचे असामान्य कार्य चंद्रगुप्त मौर्यानी केले. त्याने मगध साम्राज्याचा भारतीय प्रदेशाबरोबरच भारताबाहेरील प्रदेशातही विस्तार केला. उत्तर प्रदेशात एकमेव साम्राच्याची स्थापना केल्यानंतर चंद्रगुप्तानी आपल्या साम्राज्याचा दक्षिण भारतात राज्यविस्तार केला. तामिळ साहित्यावरुन दिसून येते की, चंद्रगुप्ताने निलगिरी पर्वतापर्यत दक्षिण भारतात राज्यविस्तार केला असावा. सौराष्ट्राच्या प्रदेशातही त्याने काही प्रशासकीय अधिकारी नेमल्याची माहिती मिळते, यावरुन याच काळात त्याने सौराष्ट्राचाही प्रदेश निश्चितपणे जिंकला असावा असे दिसते.

प्राचीन भारतीय इतिहासातील या पराक्रमी राजाने आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात जैन आचार्य भद्रबाहू यांचे शिष्यत्व स्वीकारले अशी माहिती देणा-या अनेक कथा जैन ग्रंथात आढळतात. चंद्रगुप्त धर्मात्मा असून, विशेषतःसाधूंचा आदर मोठ्या प्रमाणात ठेवीत असे. प्राचीन ग्रंथ तिलोयपण्णत्तीत त्याला मुनिदीक्षा घेणारा मुकुटबध्द सम्राटातील शेवटचा सम्राट असे म्हटले आहे. चंद्रगुप्त भद्रबाहूच्या परंपरांचा अनुयायी असून भद्रबाहूच्या परंपरेचे अनुकरण करु इच्छिणारा होता. इ.स.पू. २९८ मध्ये २५ वर्षे राज्य केल्यानंतर त्यांनी राज्यकारभाराची जबाबदारी आपला पुत्र बिंदुसार याच्याकडे टाकली व मुनिदीक्षा घेऊन तो दक्षिणेकडे निघाला. उत्तर हिंदुस्थानात बारा वर्ष दुष्काळ पडणार आहे अशी भविष्यवाणी भद्रबाहूनी केली होती. त्यामुळे मुनिसंघाचे संरक्षण करण्यासाठी भद्रबाहू दक्षिणेत आले. चंद्रगुप्त मौर्यही त्यांच्याबरोबरच श्रवणबेळगोळ येथे आल्याची माहिती अनेक शिलालेखात दिलेली आहे. भद्रबाहू श्रवणबेळगोळ येथे स्वर्गवासी झाले. त्यांच्या चरणपादुकांची पूजा करीत बारा वर्षानंतर चंद्रगुप्त मरण पावला. त्याचे स्मारक म्हणून तेथे चंद्रगुप्त वसति स्थापन करण्यात आली होती.

**बिंदुसार**

चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर बिंदुसार सम्राट झाला. याच्या कारकीर्दीत पित्यानी मिळविलेल्या प्रदेशाचे योग्य प्रकारे संरक्षण झाले. याची कारकीर्द शांतिपूर्ण व सुव्यवस्थित होती. मिस्त्र, सिरिया येथील ग्रीस राजाबरोबर त्याने मैत्रीपूर्ण संबंध निर्माण केले होते. ग्रीक राजाकडून बिंदुसाराकडे राजदूत येत असल्याची माहिती मिळते. बिंदुसाराने चंद्रगुप्ताच्या कारकिर्दीत दक्षिण भारतात मिळविलेल्या प्रदेशावर कायम स्वरुपाची सत्ता स्थापन करण्याचे कार्य केले. आपल्या कुलगुरु भद्रबाहूच्या समाधीचे दर्शन घेण्यासाइी, तसेच आपल्या

पित्याच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी तो दक्षिण भारतातही आला होता व श्रवणबेळगोळ येथे त्याने एक जैन मंदीर बांधल्याचीही माहिती मिळते.